अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०१.०७.२०२५ | अंक नं. ७९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी छोले भटूरे
Sambar PURE - VEG | Aromas of South ! Restaurant Timing 8 AM to 11 PM पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल... सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर स्क्रॅचकार्डद्वारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई + सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर 15%* पर्यंत सूट Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# केंद्र व राज्य शासनाच्या पाच लाखांपर्यंत मोफत उपचाराच्या घोषणा ठरताहेत पोकळ

## योजना राबविण्यासाठी चांगल्या सुविधा देणारे दवाखाने आहेत कुठे? गरजू रुग्णांची होतेयं हेळसांड

नगर – राज्य सरकार मार्फत राबविण्यात येणाऱ्या महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेत प्रत्येक कुटुंबाला वैद्यकीय उपचारांसाठी विमाकवच देण्यात आले आहे. या शिवाय केंद्र सरकारकडूनही आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु केलेली आहे. त्यातही ५ लाखांपर्यंत मोफत उपचाराची घोषणा करण्यात आलेली आहे. पण योजना राबविण्यासाठी चांगल्या आरोग्य सुविधा देणारे दवाखाने आहेत कुठे? अनेक मोठ्या खाजगी रुग्णालयात ही योजना राबविली जात नाही. तर कधी कधी हे उपचार योजनेत नाहीत, अशी उत्तरे रुग्णांना दिली जात असल्याने गोरगरीब गरजू रुग्णांची हेळसांड सुरु आहे. त्यामुळे शासनाच्या ५ लाखांपर्यंत मोफत उपचाराच्या घोषणा पोकळ ठरत आहेत.

महात्मा फुले जनआरोग्य योजना पूर्वी पिवळे व केशरी शिधापत्रिका धारकांसाठी होती. २ वर्षांपासून ती राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंब व अधिवास प्रमाणपत्रधारक (डोमिसाइल सर्टिफिकेट) कुटुंबांना लागू करण्यात आलेली आहे. यामुळे सरकारने मोठा निर्णय घेतला म्हणून गाजावाजा करण्यात आला. परंतु ग्रामीण तसेच शहरी मध्यमवर्गातील बहुतांश कुटुंबे ज्या खासगी रुग्णालयांत उपचारांसाठी जातात. तिथे मात्र ही योजना घेण्यात आलेली नसल्याचे सांगण्यात येते.

### खासगी रुग्णालये का होईनात योजनेत सहभागी ?

या योजनेअंतर्गत जे दर आजारांवरील उपचारांसाठी निश्चित करण्यात आले आहेत, ते शहरातील रुग्णालयांच्या दृष्टीने कमी असल्याचे प्राथमिक कारण योजनेच्या सुरुवातीपासूनच देण्यात येत आहे. या शिवाय शासनाकडून बिले ही वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे शहरांतील फारशी मोठी रुग्णालये या योजनेत सहभागी झालेली नाहीत. ही मोठी रुग्णालये ज्यामध्ये चांगल्या सुविधा आहेत, त्यांचा फायदा रुग्णांना या योजनेमधून व्हावा यासाठी राज्य सरकार कडून प्रयत्न होताना दिसत नाही. त्यामुळे राज्य शासनाने आणि राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वतीने चांगल्या आरोग्य सेवा देणाऱ्या खाजगी रुग्णालयांच्या *(पुढील मजकूर पान २ वर)*

### मुख्यमंत्री कक्षाने नाकारला सर्पदंशाच्या उपचाराचा प्रस्ताव

नगर तालुक्यातील एका शेतकऱ्याला शासनाच्या या पोकळ घोषणांचा नुकताच अतिशय कटू अनुभव आला. त्याच्या पत्नीला २५ जून रोजी अतिविषारी सापाने (नाग) दंश केला. त्या शेतकऱ्याने पत्नीला तातडीने उपचारासाठी नगरच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. त्याच्या कडे केंद्र सरकारचे आयुष्मान भारत कार्ड होते. त्या रुग्णालयात उपचार सुरु झाले, परंतु ते खाजगी रुग्णालय केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांचे अंगीकृत रुग्णालय नव्हते. रुग्णालयाने उपचाराचा खर्च सुमारे ४ लाख सांगितला. त्यामुळे त्याने अधिक चौकशी केल्यावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी साठी अर्ज करण्याचा सल्ला त्यास देण्यात आला. त्याने ३-४ दिवस धावपळ करत सर्व कागदपत्रे जमा केली. सुदैवाने मुलीच्या शिक्षणप्रवेशासाठी त्याने नुकताच तहसीलदार यांच्या उत्पन्नाचा दाखला काढलेला होता. तो कामी आला आणि त्याचे सदर दाखला काढण्यासाठीचे १५ दिवस वाचले. सर्व कागदपत्रे घेवून तो ३० जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील वैद्यकीय मदत कक्षात गेला तर त्याला सांगण्यात आले की सर्पदंश उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळत नाही. या योजनेत सदर उपचार समाविष्ट नाही. त्याने खूप विनवणी केल्यावर त्यालाच सर्व कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज करण्याचा सल्ला देण्यात आला. त्याने मंत्रालयातील हेल्पलाईन नंबरवर कॉल करून विनंती करून पाहिली परंतु काहीही उपयोग झाला नाही. तेथेही त्याचा प्रस्ताव नाकारण्यात आला. शेवटी त्याला उसनवारी करून रुग्णालयाचा खर्च भागवावा लागला. हे सरकार खरोखरच गोरगरिबांचा विचार करणारं सरकार आहे का? अशी अतिशय संतप्त प्रतिक्रिया त्या शेतकऱ्याने व्यक्त केली.

परिमल मंदिर, हॅन्डल्वर वी सुवासिक सुगंधाबद्दल!
६ सुवासिक सुगंधासह शुभलाभ बेस्ट ६ झीपर पाऊच. ६ इन वन,१२० ग्रॅम
फक्त रु. ५० मध्ये | २५ ग्रॅम रु. चा रु. १० मध्ये
तसेच-डिस्को, कापूर, शेंद्र,अत्तरे,धुप व अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅडर (शिडी) उपलब्ध

फ्लेक्स प्रिंटींग 9403232323

विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठला.. हरिओम विठ्ठला..
आषाढी एकादशीच्या महाउपवासासाठी
राजमोती साबुदाना
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना • इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
-: स्टॉकिस्ट :- मे. कांतीलाल घेवरचंद शिंगवी दाळ मंडई, अहमदनगर. फोन : 2344823/9422220723
आजच आपल्या जवळच्या दुकानदाराकडे मागणी करा!

# शेतात झाडाला गळफास घेऊन वारकऱ्याची आत्महत्या


सुखदेव रावे

नगर – नगर तालुक्यातील रुईछत्तीसी गावच्या शिवारात शेतातील कडुनिंबाच्या झाडाला गळफास घेऊन एका वारकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना ३० जून रोजी सकाळी उघडकीस आली. सुखदेव लक्ष्मण रावे (वय ६२, रा. मिसळवाडी, बुलढाणा) असे आत्महत्या केलेल्या वारकऱ्याचे नाव आहे.

मयत सुखदेव रावे यांचा केस कर्तनाचा व्यवसाय असून ते दरवर्षी पंढरपूरची वारी करत होते. या वर्षी ते गावाहून आळंदी येथे गेले, तेथून दिंडीत सहभागी झाले, दिंडीचा मुक्काम नातेपुते येथे असताना त्यांनी एसटी बसने पंढरपूर गाठले, तेथे विठ्ठलाचे दर्शन घेवून ते पुन्हा एसटी बसने गावाकडे जात होते. मात्र २९ जून रोजी सायंकाळी ते रुईछत्तीशी गावाजवळ उतरले होते. त्यानंतर ३० जून रोजी सकाळी धर्मा अण्णा गोरे यांच्या शेतात कडुनिंबाच्या झाडाला त्यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.

ही माहिती नगर तालुका पोलिसांना कळविण्यात आल्यावर पोलिसांनी रुग्णवाहिका बोलावून रावे यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते औषध उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार आबासाहेब झावरे करीत आहेत. मयत रावे यांचे शवविच्छेदन केल्यावर मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, एक बहीण, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

कोटी कोटी वंदना..!
मौन साधक पू.गु. प्रार्थना पट्ट मुनिश्री जयवर्धनजी म.सा. 'पीयूष' के जीवन यात्रा के ६८ वर्ष पूरे होनेपर मन:पूर्वक कोटी कोटी वंदना ! और आगे की यात्रा को शुभकामना !
संदीप लोढा व परिवार
केवल अगरबत्ती तापीदास गल्ली, अ.नगर.
प.पू.श्री. जयवर्धनजी म.सा. 'पीयूष'

# आपलं शहर.. एक विनोदी शहर..

## आज जागतिक विनोद दिवस आहे

जगात तो एकच दिवस पाळला जातो, पण हे जग फार पाठीमागे आहे. आपण फार पुढे आहोत, कारण आपल्या शहरात तर ३६५ दिवस विनोद दिवस पाळला जातो.. प्रामाणिक करदात्यांच्या तिजोरीतून सत्ताधारी पक्षाकडून लाडका लाडकी च्या लाडाखातर हजारो कोटी रुपये वाटले जातात...८० कोटी जनतेला आईतखाऊ, आळशी, आणि काम चुकार बनवण्यासाठी मोफत शिधा दिला जातो, पण त्याच सत्ताधारी पक्षाकडून आमच्या शहरातल्या पालिकेला पगार करायला पैसे नसतात... ड्रेनेज झाकण बदलायला निधी, पैसे नसतात... ब्रिटिशांच्या काळात ओढलेल्या लाईटच्या खांबावरील तारा गंजून तुटायला लागल्या तरी बदलायला पैसे नसतात.. देशभर विक्रमी वेळेमध्ये उड्डाणपूल एक मजली दोन मजली तीन मजली... रात्री तुन पूर्ण होतात.. विक्रम नोंदवला जातो.. आमच्या शहरात आनंदी बाजार पासून पटवर्धन चौकापर्यंत छटाक भर फक्त शंभर मीटरचा रस्ता एक वर्ष झालं तरी अजून काम चालूच आहे..असा विक्रम नोंदवला जातो.



व्यंगचित्र सुहासभाई मुळे

महाराष्ट्रातला सर्वात मोठा जिल्हा आणि सर्वात कमी पोलीस बळ.. त्यातल्या त्यात वाहतूक पोलीस म्हणजे रस्त्यावर चुकून दिसणारा दुर्मिळ प्राणी... सब कुछ रामभरोसे... स्वच्छतेचे पहिलं बक्षीस मिळालेल्या या जिल्ह्यामधल्या कचरा उचलणाऱ्या एजन्सी ला कामात बेशिस्त पण आणि हलगर्जीपणासाठी मनपा कडून सहा सहा लाख रुपये दंड करावा लागतो आहे, आणि आता तर त्याची एजन्सी काढून घ्यायचा विचार करावा लागतो आहे..

दोनशे तीनशे कोटी रुपये वेगवेगळ्या गोंडस नावाच्या पाणी योजनांवर निधी पाण्यात घालून वर्षातले निम्मे दिवस सुद्धा शहरात वेळेवर स्वच्छ आणि सर्व दूर पाणी देऊ शकत नाही... आता म्हणे नवीन योजनेसाठी ४५० कोटी रुपये चा प्रस्ताव दिला आहे.. अमृत योजनेचे पाईप आता पृथ्वीवर जर तिसरं महायुद्ध झालं, तरच ते पाईप नेमके कुठे गाडले गेले आहेत ते उफाळून बाहेर येतील.. आज तर कोणीच सांगू शकत नाही.. कारण कॉन्ट्रॅक्टर केव्हाच आऊट ऑफ कव्हरेज एरिया आहे..

काय विनोदामागे विनोद चालले आहेत.. आपल्या शहरात.. आता निवडणुका जाहीर झाल्या आहेत.. बिळात लपून बसलेले सगळे इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून चौका चौकात हात जोडायला लागतील... एका वार्डात चार जण.. कुठल्याही कामाचे ठेकेदाराचे कमिशनचे वाटेकरी..

विकासाचे खांदेकरी.. कमिशन मधून मिळालेल्या नोटांच्या जीवावर परत परत कदाचित निवडून येतील.. विकासाची चपटी आणि कमिशनची भेळ... त्याच तिकिटावर परत तोच खेळ... आपलं शहर एक विनोदी शहर.. वर्षानुवर्ष पक्के झालेले अतिक्रमणं काढायचा एक दिवस फार्स केला जातो.. दुसऱ्या दिवशी रिकाम्या झालेल्या जागेवर तिथेच हातगाड्या लागतात .. मग हातगाड्या काढण्याचा फार्स एक दिवस केला जातो.. मग तिसऱ्या दिवशी तिथेच पथारी वाली बसतात.. बांधकाम परवानगी घ्यायचं कारणच राहिलं नाही रात्रीतून गरडर पत्रे आणून रेल्वे गाडी पेक्षा पण लांबलचक पत्र्यांचे दुकानं उभे करायचे.. टॅक्स नाही शॉप ॲक्ट नाही ..कुछ नही

मनपाचे अधिकारी त्या पत्र्याच्या दुकानांसमोरून डोळ्याला भात बांधून निघून जातात.. आणि प्रामाणिक करदात्याला सतरा वेळेस त्याच्या घराचे मापं घेऊन किती जास्त कर त्याच्या खिशातून कापला जाऊ शकतो हे पाहणार..

आपल्या शहरासारखे विनोदी शहर दुसरे कुठेच नसेल.. आज जागतिक विनोद दिवसाच्या सहनशील नगरकरांना जनहित परिषद व जागरुक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांच्याकडून विनोदी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

किरण (सर) दाभाडे
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
हॅलो : 8999283998
हॅलो ग्रुप अहिल्यानगर । पुणे । नाशिक
नातेवाईक ग्रुप, पुणे
शुभेच्छुक

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# राज्यभरातील '१०८ रुग्णवाहिका' चालकांनी केले जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काम बंद आंदोलन

## राज्यातील ॲम्बुलन्स चालकांना समान काम समान वेतन द्या, शासनाने व बीव्हीजी कंपनीने काम बंद पाडण्याची वेळ आणली



ॲम्बुलन्स चालकांना समान काम समान वेतन द्या, या मागणीसाठी राज्यभरातील १०८ रुग्णवाहिका चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काम बंद आंदोलन केले.

नगर – राज्यातील १०८ ॲम्बुलन्स वाहन चालक गेल्या अनेक वर्षापासून अत्यंत महत्त्वपूर्ण सेवा देत आहे. त्यांच्या समस्यांबाबत १३ मे २०२५ रोजी आझाद मैदान मध्ये आंदोलन करून निवेदन दिले होते. त्यावेळी १०८ वाहन चालकांच्या मागण्यांबाबत शासनाने व बीव्हीजी कंपनीने सकारात्मक भूमिका घेऊन न्याय देण्याचे आश्वासन दिले गेले. मात्र कोणतीही कारवाई झाली नसून राज्यातील १०८ ॲम्बुलन्स चालकांचा काम बंद आंदोलन सुरू करून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करताना १०८ रुग्णवाहिका चालक युनियन संघटनेचे अध्यक्ष अशोक कराळे, उपाध्यक्ष अतुल शिंदे, संजय दरवडे, सतीश शिरसाठ, नितीन चेमटे, शरद अस्वर, संजय ओहोळकर, राहुल वाकचौरे, वाल्मीक शितोळे, संतोष चौधरी, भीमराज मोकाटे, जगन्नाथ खेमनार, आप्पासाहेब झुंबड, किशोर घनवट, सुनील देशमुख, सोमनाथ बांडे आदीसह चालक उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सेवा पुरवठा बीव्हीजी कंपनी कडून कुठलाही प्रतिसाद मिळत नाही. चालक संघटनेने ही सेवा बीव्हीजी कंपनी यांना निवेदन देऊन चर्चा करण्याची विनंती केली होती. १५ जून पर्यंत चर्चा करून मागण्याचे पूर्तता न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा ही देण्यात आला होता. परंतु १०८ वाहनचालकांच्या मागण्यांबाबत कुठली हालचाल करण्यात आली नाही. त्यामुळे ॲम्बुलन्स चालकांमध्ये तीव्र असतो निर्माण होऊन त्यांच्या अल्प वेतनावर त्यांना काम करावे लागते व ॲम्बुलन्सची अवस्था अत्यंत वाईट असून ॲम्बुलन्सला आग लागून रुग्ण व वाहनचालकाचा जीवितास धोका निर्माण होईल अशा घटना पुन्हा पुन्हा घडत आहे व वाहनचालकाकडून ज्यादा काम करून घेतले जाते परंतु त्यांना कुठलाही मोबदला दिला जात नाही तसेच समान काम समान वेतन दिले पाहिजे व पीएफ २०१४ ते २०१७ पर्यंत कापलेल्या नसून तो मिळावा तसेच कोविड काळामध्ये ॲम्बुलन्स चालकांनी जीवावर उदार होऊन काम केले आहे मात्र त्यांना कुविड भत्ता शासनाने कंपनीला देऊन देखील कंपनीने कर्मचाऱ्यांना दिलेला नसून तो देण्यात यावा व रुग्णवाहिका चालक याला कोणताही सुरक्षा कवच विमा नसून विमा करण्यात यावा. या विविध मागण्यांसंदर्भात सविस्तर निवेदन या पूर्वीच शासनाला व बीव्हीजी कंपनीला दिलेले आहे. मात्र दुर्दैवाने कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे तातडीने कंपनी यांच्याबरोबर संघटनेचे संयुक्त बैठक बोलावून त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय करावा अशी मागणी करण्यात आली आहे व रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून गेले अनेक वर्ष मागण्या प्रलंबित असतानाही काम सुरू ठेवले आहे परंतु आता बीव्हीजी कंपनी ही या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय रुग्णवाहिका चालक युनियनने घेतला असून लवकरात लवकर मागण्या मान्य करण्यात यावे अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...



वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

### रोजगार वाढवा...गरिबी हटाओ...

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांचा एक लेख वाचला. यात त्यांनी गरिबी निर्मूलनासोबत रोजगारवृद्धी हवी यावर भर दिला आहे.

जागतिक बँकेच्या अलिकडच्या अभ्यासान्वये गेल्या १० वर्षात भारतातील अतीगरीब लोकांची संख्या लक्षणीयरित्या घटली आहे. आज घडीला जगातील सुमारे ८४ कोटी लोक अतीगरिबीत राहात आहे. शिवाय काही देशांच्या युद्धाने अधिकच गंभीर समस्या उभ्या राहिल्यात. भारतात त्या ८४ कोटींपैकी ७.५ कोटी म्हणजेच सुमारे ९% अतीगरिब आहेत.

जागतिक लोकसंख्येत भारताचा वाटा १८% आहे. त्या तुलनेत विचार केल्यास गरिबी निर्मूलनात भारताची कामगिरी जागतिक सरासरीपेक्षा चांगली आहे.

तथापी, दारिद्र्यरेषेतून बाहेर पडणे म्हणजे कायमचे त्यातून बाहेर पडणे असे नाही. अशा परिस्थितीत केवळ मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीच नागरिकांचे जीवनमान शाश्वतपणे सुधारू शकते.

भारतातील अतीगरिब लोक अजूनही एकूण लोकसंख्येच्या ५.३% आहेत. संयुक्त राष्ट्राने शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाने २०३० पर्यंत दारिद्र्य उच्चाटनाचे ध्येय ठेवलेय.

दारिद्र्य रेषेतून बाहेर पडणे म्हणजे कायमचे त्यातून बाहेर पडणेच असे नाही. उपजिविकेचा मार्ग अनिश्चित असेल तर आजारपण, मृत्यू, नोकरी जाणे इ. मुळे व्यक्ती पुन्हा गरिबीत जाऊ शकतो. अशा स्थितीत अर्थपूर्ण व सार्वजनिक सामाजिक सुरक्षा राखण्यासाठी आपण सातत्याने प्रत्न केला पाहिजे. आर्थिक संसाधने मर्यादित असल्याने अन् सरकारी खर्चात अविवेकी वाढ करता येत नसल्याने मर्यादा पडतात. अशा स्थितीत केवळ मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीच नागरिकांना योग्य जीवनमान देऊ शकते. त्यासाठी मोठ्या अवजड उद्योगधंद्यांसह हजारो लघुउद्योगांची निर्मिती आवश्यक असून त्या जोडीला मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण कौशल्य विकास करावे लागेल. कुटीरोद्योग, गावपातळीवर छोटे मोठे व्यवसाय, महिला बचत गट इ. घटकांना प्रोत्साहन द्यावे लागेल. स्वयंरोजगार वाढवावे लागतील.

# केंद्र व राज्य शासनाच्या पाच लाखांपर्यंत मोफत उपचाराच्या घोषणा ठरताहेत पोकळ

(पान १ वरुन)

अडचणी नेमक्या काय आहेत. या जाणून घेवून त्या सोडविण्याचा प्रयत्न करण्याची आणि या रुग्णालयांना या योजनेत सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

### उपचार खर्चामुळे गोरगरीब होताहेत कर्जबाजारी

सरकारचा भर केवळ जाहिरातबाजीवर वर आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे शासनाच्या जाहिरातबाजीने भारावून गेलेल्या आणि खरच या योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे, अशा गोरगरीब रुग्णांचा उपचारासाठी दवाखान्यात गेल्यावर मोठा भ्रमनिरास होताना दिसतो. त्याला तातडीच्या उपचाराची गरज असल्याने उसनवारी करून पैसे जमा करावे लागत आहे. प्रसंगी कर्ज काढून त्याला दवाखान्याचा खर्च भागवावा लागत आहे.

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठीही जाचक अटी शर्थी

नागरिकांना मुख्यत्वे अपघात, सर्पदंश किंवा हृदयविकाराचा झटका या ३ कारणांसाठी तातडीने उपचार मिळण्याची आवश्यकता असते. त्यामुळे त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करणे गरजेचे असते, या तीनही प्रकारच्या रुग्णाला उपचार वेळेत न मिळाल्यास रुग्ण दगावण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे रुग्णाचे नातेवाईक हे सदर रुग्णालय महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे अंगीकृत रुग्णालय आहे की नाही, याचा विचार न करता फक्त आपल्या रुग्णाचा जीव वाचवायचा आहे, हा विचार करून सुविधा असलेल्या कोणत्याही रुग्णालयात रुग्णाला दाखल करतात.

तेथे योजनेचा लाभ न मिळाल्याने त्याला मुख्यमंत्री वैदकीय सहाय्यता निधी ची गरज भासते. मात्र तो निधी मिळविण्यासाठी जाचक अटी शर्थी असल्याने मोठी कसरत करावी लागत आहे. त्यातील एक प्रमुख अट म्हणजे तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला. हा दाखला मिळविण्यासाठी शासकीय नियमानुसार १५ दिवसांचा कालावधी लागतो. त्यानंतर मंत्रालयात ऑनलाईन अर्ज करून सर्व कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. दुसरी अट म्हणजे जो पर्यंत मदत निधी मंजूर होत नाही तो पर्यंत रुग्णाला गरज नसतानाही रुग्णालयातच राहावे लागते. रुग्णालयाने १ लाख खर्च सांगितला असेल तर तो १०० टक्के दिला जात नाही, कधी कधी ५० टक्केच निधी दिला जातो. मात्र तो पर्यंत रुग्णालयाचे खाटांचे भाडेच तेवढे झालेले असते. मग तो मदत निधी मिळूनही त्या गरजू रुग्णाला काहीही उपयोग होत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी हा रुग्णांना दिलासा देण्यासाठी आहे की रुग्णालयांना वाढीव पैसे मिळण्यासाठी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### मुख्यमंत्री कक्षाला सर्पदंश उपचाराचे वावडे का?

सर्पदंशाचे प्रमाण प्रामुख्याने ग्रामीण भागात जास्त असते, शेतात काम करणारे शेतकरी, गोरगरीब शेतमजूर महिला – पुरुष यांना शेतात काम करताना सर्पदंश होण्याचे प्रकार वारंवार घडतात. काही सर्प विषारी नसतात पण नाग अथवा घोणस हे अतिविषारी सर्प ही आपल्याकडे आढळतात. या अतिविषारी सर्पाच्या दंशानंतर त्या व्यक्तीला तातडीने उपचाराची गरज असल्याने जवळच्या रुग्णालयात दाखल केले जाते. तेथे जर आरोग्य योजना नसेल तर मुख्यमंत्री सहाय्यता निधी मिळणे गरजेचे आहे. पण तो मिळत नाही, त्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाला सर्पदंश उपचाराचे वावडे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

### तर शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करावा

महावितरणकडून शेतीसाठी दिवसाऐवजी रात्रीच्या वेळी वीज पुरवठा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्री अपरात्री पिकांना पाणी द्यावे लागते. अनेकदा यावेळीच शेतकऱ्यांना सर्पदंश झाल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी वारंवार अनेक घोषणा करणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी सर्पदंश उपचारासाठी मदत निधी देण्याचे सुरु करावे तसेच शेतकऱ्यांना शेती साठी रात्री ऐवजी दिवसा वीज पुरवठा सुरु करावा अशी मागणी शेतकरी, शेतमजूर वर्गाकडून होत आहे.

## गंगानाथ महाराज यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – माळीवाडा भोपळेगल्ली येथील कानिफनाथ मंदिरातील गुरू गंगानाथ महाराज (वय ९१) यांचे १ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दु. १२ वा. नवनाथ मंदिर भोपळेगल्ली माळीवाडा येथून निघाली. गुरू गेंडानाथ महाराज समाधी जवळ काटवन खंडोबा रोड नाथ कृपा लॉन शेजारी अहिल्यानगर येथे त्यांच्यावर अंत्यविधी झाले.

नाथपंथी गेंडानाथ महाराज विशाल गणपती मंदिराचे संगमनाथ महाराज यांचे गुरू बंधू होत.

त्यांच्यामागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नाथकृपा लॉजींग, नाथकृपा स्विटस्, नाथकृपा मंगल कार्यालयाचे शिवाजी, बाबासाहेब, मधु जाधव यांचे ते वडील होत. नगरसेविका सुवर्णाताई दत्तात्रय जाधव यांचे ते चुलत सासरे होत.

## घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील बुरुडगाव रोडवरील चाणक्य चौक येथील नंदनवन कॉलनी येथे राहणारे वकील दीपक वसंतराव शिंदे (वय ७१) यांची घरासमोर रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो कंपनीची ॲक्टिवा मोपेड (क्र. एम एच १६ डी यु २७७) अज्ञात चोरून नेली. ही घटना २९ जून रोजी रात्री १० ते ३० जून रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ तातडीने बरखास्त करुन सक्षम प्रशासक व चौकशी समितीची त्वरित नेमणूक करावी

## विशाल सुरपुरिया यांची धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार

नगर – शनीशिंगणापुरच्या श्री शनैश्वर देवस्थानचे विश्वस्त मंडळ व देवस्थान मधील कर्मचाऱ्यांनी केलेल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी अहिल्यानगरचे भाजपचे कार्यकर्ते विशाल सुरपुरिया यांनी धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार अर्ज दिला आहे. या तक्रार अर्जात शनीशिंगणापुरच्या श्री शनैश्वर देवस्थानचे विश्वस्त मंडळ तात्काळ बरखास्त करून सक्षम प्रशासकाची नेमणुक करावी. विश्वस्त मंडळ यांनी केलेल्या अपहाराची सखोल चौकशीसाठी तात्काळ समितीची नेमणुक करण्यात यावी. बनावट ॲपव्दारे झालेली फसवणुक ही देवस्थानची व भाविकांची असल्याने त्या संदर्भात महाराष्ट्र राज्य सायबर क्राईम, मुंबई व महाराष्ट्र राज्य इ. ओ. डब्लू, मुंबई यांच्या मार्फत तपास करण्याचे योग्य ते आदेश द्यावेत, अशा मागण्या विशाल सुरपुरिया यांनी केल्या आहेत.

विशाल सुरपुरिया यांनी दिलेल्या ताक्रारीत नमूद केले आहे की, शनीशिंगणापुरच्या देवस्थान व कर्मचाऱ्यांनी केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या घोटाळा प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. तसेच राज्याचे अप्पर पोलिस महासंचालक व इ. ओ. डब्लू. मुंबई यांच्याकडेही पत्र पाठवुन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मात्र आजपर्यंत सदर प्रकरणात कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नसुन सदरच्या विश्वस्त मंडळाला कुठलाही कायद्याचा धाक राहिलेला नाही.

त्यामुळे हे विश्वस्त मंडळ तातडीने बरखास्त करण्यात येऊन सक्षम प्रशासकाची व चौकशी समितीची त्वरित नेमणुक करावी, अशी तक्रार ॲड. अमित सुरपुरिया व ॲड. स्वाती जाधव यांच्या मार्फत विशाल सुरपुरिया केली आहे.

## बाबुराव सोनवणे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नगर तालुक्यातील हिंगणगाव येथील बाबुराव लक्ष्मण सोनवणे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, परतोंडे असा परीवार आहे. प्राथ. शिक्षक विकास मंडळाचे माजी विश्वस्त लक्ष्मण सोनवणे यांचे ते वडील, रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त शिक्षक एम. टि. सोनवणे यांचे चुलते तर पत्रकार नागेश सोनवणे यांचे ते आजोबा होत.

## पद्माबाई गांधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – संगम चौक खिस्त गल्ली येथील रहिवासी पद्माबाई कुंदनमल गांधी (कर्जतवाला, वय ७२) यांचे १ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सराफ बाजारातील सराफ व्यावसायिक चेतन गांधी यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# पोलीस वसाहतीमधून वाहनाची चोरी

नगर – नगर शहरासह उपनगरातून दुचाकी चोरीच्या घटना वाढत असून वाहन चोरांनी चक्क पोलीस वसाहतीच्या आवारात पोलिसांच्या ताब्यात असलेली मोपेड चोरुन नेली. ही घटना भिंगार येथील पोलीस वसाहतीच्या आवारात घडली.

याबाबतची माहिती अशी की भिंगार कॅम्प पोलीसांच्या ताब्यात असलेला मुद्देमाल भिंगार पोलिसांनी पोलीस वसाहतीच्या आवारात ठेवलेला आहे.

या मुद्देमालामध्ये जानेवारी २०२५ मध्ये मेटल ग्रे रंगाची एक्सेस १२५ मोपेड गाडी (क्र. एम एच १६– ५५७९) गुन्ह्यात जप्त करुन भिंगार पोलीस वसाहतीमध्ये असलेल्या मुद्देमालामध्ये ठेवली होती. सदर मोपेड २८ जून रोजी मुद्देमालाच्या जागी मिळून आली नाही. पोलिसांनी त्यामुळे अन्य मुद्देमालामध्ये व इतरत्र शोध घेतला असता की मिळून आली नाही. यावरुन गुन्ह्यात जप्त केलेली मोपेड गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची खात्री भिंगार पोलिसांना झाली.

याप्रकरणी पोलीस हवालदार विठ्ठल राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हरीभाऊ कापसे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – तालुक्यातील भेर्डापूर/पाथरे येथील शेतकरी हरीभाऊ शिवराम कापसे (वय ६३ वर्षे) यांचे नुकतेच अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी मंदा, १ मुलगा सोमनाथ, पुतणे, सूना, नातवंडे असा परिवार आहे. अशोक कारखान्यातील कर्मचारी शशिकांत कापसे यांचे ते चुलते होत.

## अजय ड्रायक्लिनर्सचे संचालक अजय आठवले यांचे निधन



भिंगार – आंबेडकर सोसायटी नगर–पाथर्डी रोड भिंगार येथील रहिवासी अजय शिवराम आठवले (वय ५०) यांचे ३० जून रोजी निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले असा परिवार आहे. नगर पाथर्डी रोड पोलिस लाईन समोरील अजय ड्रायक्लिनर्सचे ते संचालक होते.

# गॅस पाईपलाईन खोदाईतील नुकसान भरपाईत गैरव्यवहार

## १५ जुलैपासून आमरण उपोषण



सागर खरपुडे

नगर – नागरदेवळे येथील भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.मार्फत घरगुती गॅस पाईपलाईन टाकण्याच्या कामासाठी झालेल्या खोदाईमुळे सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्याच्या भरपाईबाबत गैरव्यवहार झाल्याचा आरोप सागर रमेश खरपुडे यांनी केला आहे. त्यांनी जिल्हा परिषद, अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या स्मरणपत्राद्वारे या प्रकरणात चौकशी समिती नेमण्याची मागणी करत, अन्यथा १५ जुलै पासून ठिया आंदोलन व अमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

सागर खरपुडे यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, गॅस पाईपलाईनच्या कामासाठी गावातील डांबरी व कॉंक्रीट रस्ते, ड्रेनेज, पाण्याच्या पाइपलाइन, गटार, संरक्षण भिंती इ. चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या नुकसानीसाठी भरपाई रक्कम म्हणून भारत पेट्रोलियम कंपनीने डिसेंबर २०२४ मध्ये नागरदेवळे ग्रामपंचायतीच्या खात्यावर १ कोटी ६६ लाख ५० हजार रुपये वर्ग केले होते. मात्र, ही रक्कम कोणत्याही ग्रामसभेच्या मंजुरीशिवाय तसेच कोणतेही ठोस मार्गदर्शक तत्व न पाळता अपारदर्शक रीतीने वापरण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

सागर खरपुडे यांनी यासंदर्भात ३० मे रोजी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत प्रशासक यांना तक्रार अर्ज दिला होता, तसेच माहितीच्या अधिकारात अर्ज करून माहिती मागवली होती. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, की कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही. यावरून प्रशासनही दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

सागर खरपुडे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून नागरदेवळे ग्रामपंचायतीवर प्रशासक असल्याने कोणतेही कार्यकारी मंडळ अस्तित्वात नाही. त्यामुळे सर्व निर्णय हे प्रशासक व कर्मचारी घेत आहेत. ग्रामस्थांना विश्वासात न घेता नुकसान भरपाईची रक्कम कमी दराने स्वीकारली गेली आहे. यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट असून, याची चौकशी झालीच पाहिजे. अन्यथा १५ जुलै पासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून अमरण उपोषणास बसणार आहोत. ही तक्रार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांबरोबरच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.), गटविकास अधिकारी व कोतवाली पोलिस निरीक्षक यांच्याकडेही देण्यात आली आहे. ग्रामस्थांनी यासंदर्भात स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# अहिल्यानगरमध्ये सुनेने केला सासऱ्यांचा अंत्यविधी; मुखाग्नी देऊन केले कर्तव्य पूर्ण



रमाकांत कुलकर्णी

नगर – आपल्या समाजामध्ये जे पुरुष करू शकतो, ते एका स्त्रीने केले आहे. अहिल्यानगर शहरातील गंगा उद्यान येथील पंकज कॉलनीतील रहिवासी सौ. उज्ज्वलाताई कुलकर्णी यांनी त्यांच्या सासू सासऱ्यांना स्वतःच्या आई–वडिलांप्रमाणे सांभाळून त्यांचे उतारवयात सुद्धा मनोभावे सेवा केली. त्यांचे सासरे रमाकांत वासुदेव कुलकर्णी यांचे २७ जून रोजी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी येथील अमरधाममध्ये पार पडला. सध्याच्या काळात मुलगा देखील जे करू शकत नाही, ते एका सुनेने करून दाखवले आहे. कै. कुलकर्णी यांना सुनेने मुखाग्नी देऊन आपले कर्तव्य पूर्ण केले.

कै. कुलकर्णी यांना स्वतःच्या आई–वडिलांप्रमाणे सांभाळून त्यांची सुन सौ. उज्ज्वलाताई कुलकर्णी यांनी अंत्यविधी पूर्ण करून अग्नी दिला. आपले कर्तव्य पूर्ण केले.

उज्ज्वलाताई कुलकर्णी या सर्वसामान्य कुटुंबातील असून, त्यांनी समाजापुढे एक संदेश देऊन आदर्श निर्माण केला आहे. सासू–सासऱ्यांची त्यांनी आपल्या आई–वडिलांप्रमाणे सेवा केली. त्यांनीही सुनेऐवजी मुलीप्रमाणेच त्यांना माया दिली. आज समाजामध्ये अनेक वाईट घटना घडत असताना, अशी उदाहरणे कमीच पाहायला मिळतात.

# गृहिणी

## आरोग्य

### पावसाळ्यात असे का होते?

पावसाळ्यात हवेत जास्त आर्द्रता असते, ज्यामुळे केस घाणेरडे आणि लवकर चिकट होतात. हे टाळण्यासाठी, लोक सामान्य दिवसांपेक्षा जास्त वेळा शॅम्पू करतात, ज्यामुळे तुमच्या केसांमधील ओलावा निघून जाऊ शकतो. यामुळे केस कमकुवत होतात आणि तुटू लागतात. पावसात भिजल्यानंतर, अँटी-फंगल माइल्ड शाम्पूने तुमचे केस धुवा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा शॅम्पू करा. जर तुमचे केस पावसात ओले झाले तर ते मायक्रोफायबर टॉवेलने वाळवा किंवा हवेत वाळू द्या. पावसाळ्यात केस सुकविण्यासाठी आणि स्टाईल करण्यासाठी केसांच्या साधनांचा वापर टाळा. पावसाळ्यात केस गळती रोखण्यासाठी चांगले कंडिशनर वापरा. ओले केस कंधी करू नका. केसांचा गुंता सोडवण्यासाठी रुंद दात असलेला कंगवा वापरा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा केसांना तेल लावा, यामुळे तुमचे केस पोषण आणि मजबूत होतील.

## पाककला

### फणसाचे लोणचे

**साहित्य** – ५०० ग्रॅम फणस, २५० मिली मोहरीचे तेल, चवीनुसार मीठ, १ चमचा हळद पावडर, २ चमचे लाल तिखट, २ चमचे मोहरीची डाळ, २ चमचे बडीशेप, १ चमचा मेथीचे दाणे, १/२ चमचा हिंग, २ चमचे व्हिनेगर

**कृती :** फणस सोलून त्याचे तुकडे करा आणि हलके उकळा आणि चांगले वाळवा. सर्व मसाले घाला आणि चांगले मिसळा. मोहरीचे तेल गरम करा आणि थंड करा आणि लोणच्यात घाला. शेवटी व्हिनेगर घाला आणि मिसळा आणि एका भांड्यात भरा आणि ३-४ दिवस उन्हात ठेवा. स्वादिष्ट फणसाचे लोणचे तयार आहे.

**टिप :** प्रथम फणसाचे तुकडे नीट धुवा. नंतर थोडे मीठ आणि पाणी घाला आणि स्टीमरमध्ये सुमारे १० मिनिटे शिजवा जेणेकरून ते मऊ होतील. त्यानंतर ते गाळून घ्या आणि पूर्णपणे थंड होऊ द्या. लोणच्यात ओलावा राहू नये म्हणून हे महत्वाचे आहे. मेथीचे दाणे, बडीशेप आणि मोहरी तेल न घालता पॅनमध्ये हलके तळा जेणेकरून त्यांचा सुगंध येईल. आता ते थंड करा आणि बारीक बारीक करा. आता त्यात हळद, तिखट, मीठ आणि हिंग घाला. उकडलेले सुके फणसाचे तुकडे एका मोठ्या भांड्यात ठेवा आणि त्यावर सर्व मसाले चांगले मिसळा जेणेकरून प्रत्येक तुकडा मसाल्यांनी लेपित होईल.

## वास्तू

✻ दर शनिवारी घराच्या उंबरठ्यावर गोमूत्रामध्ये हळद कालवून त्याचा शिंपडा करावा आणि त्याचा पट्टा ओढावा.

✻ आंघोळ झाल्यावर रोज मुंग्यांना साखर घालावी.

✻ रोज वास्तू देवतेला न चुकता नैवेद्य दाखवावा.

✻ दर अमावस्येला तिन्ही सांजेला घरावरून दही भाताची मूद सात वेळा उतरवून रस्त्यावर टाकावी.

## सल्ला

रात्री उरलेली चपाती सकाळी शिळी दुधासोबत खाल्ल्याने अपचन, गॅस, ॲसिडिटी या आजारांपासून आराम मिळतो.

## सौंदर्य

पुदिन्याच्या पानांचा रस चेहऱ्यावर लावल्याने चेहरा मुलायम आणि कोमल बनतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. २ जुलै २०२५

**बुधाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, उत्तरा ११।०७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. घरांत उत्साहाचे बातावरण होईल.

**वृषभ :** जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**कर्क :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**सिंह :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**कन्या :** आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल. शत्रूंपासून सावध राहा.

**तूळ :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**वृश्चिक :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल.

**मकर :** घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.


**कुंभ :** आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**मीन :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२११

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** – १) मुळीच नसणे ४) समुद्र; मर्यादा; अंत ७) ज्याला आवश्यकता किंवा नड आहे असा ९) भस्म; रक्षा १०) मोठी नदी ११) जंगलाला लागलेली आग; दावानल १२) आफ्रिका खंडातील एक देश १३) शिक्का मारून बंद करण्यात येणारी प्रक्रिया (लिफाफा, दरवाजा वगैरे) १४) भरवसा; विश्वास १५) नाव; गंधाचा टिळा १७) आठवड्यातील एक दिवस १९) घाई; धांदल; गडबड; त्वरा २१) महसूल; हात; हस्त २२) एक झाड ; वटवृक्ष २३) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र

**उभे शब्द :**– १) एक ऋषी २) वजन; ओझे ३) जड असलेले; पतदार; ४) पडणे; नाश; पतन ५) काशीचे दुसरे नाव ६) राखणदार; रक्षक; पहारेकरी ८) नमन; प्रणाम; सुरुवात; प्रारंभ १२) मुलगा; पुत्र; तनय १५) एक विषारी साप १६) मळालेला १७) पवित्र; कल्याणकारक; शुभ १८) उत्तराधिकारी; हक्कदार १९) अंगावरील बारीक केस; श्रीरामाचा एक मुलगा; रोम २०) किल्ला (विशेषतः डोंगरी)

### शब्दगंध क्र. ७२१० चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** एखाद्या जवळ आपल्या अशा आठवणी ठेऊन जा, की नंतर त्याच्या जवळ आपला विषय जरी निघाला तर, त्याच्या ओठांवर थोडसं हसु आणि डोळ्यात थोडसं पाणी आले पाहिजे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पुरुषांनाही स्तनाचा कर्करोग होतो का?

हे खरे आहे की स्तनाचा कर्करोग सामान्यतः महिलांमध्ये आढळतो, परंतु पुरुषांनाही हा आजार होऊ शकतो. जरी तो दुर्मिळ असला तरी, पुरुषांमध्ये स्तनाचा कर्करोग एकूण प्रकरणांपैकी एक छोटासा भाग आहे. पुरुषांमध्ये या आजाराचे निदान होण्याची शक्यता जास्त असते कारण त्यांचे निदान बहुतेकदा प्रगत टप्प्यात होते (जेव्हा कर्करोग शरीराच्या इतर भागात पसरलेला असतो), तर महिलांमध्ये या आजाराचे निदान होण्याची शक्यता कमी असते. स्तनामध्ये लालसरपणा, पिंपल्स (संत्र्याच्या सालीसारखे) किंवा स्तनाच्या त्वचेचे आकुंचन हे देखील स्तनाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते.

कर्करोग काखेतील लिम्फ नोड्समध्ये पसरू शकतो, ज्यामुळे तेथे गाठ किंवा सूज येऊ शकते. जरी गाठी बहुतेकदा वेदनारहित असतात, तरी काही पुरुषांना स्तनात वेदना किंवा अस्वस्थता जाणवू शकते. सर्वात सामान्य लक्षण म्हणजे गाठ सहसा वेदनारहित असते आणि स्तनाग्राजवळ जाणवू शकते.

जर तुम्हाला तुमच्या स्तनात नवीन गाठ किंवा सूज दिसली तर ताबडतोब डॉक्टरांना भेट द्या. स्तनाग्रातून रक्त किंवा इतर स्राव, बुडलेले (उलटे) स्तनाग्र, किंवा स्तनाग्रभोवतीच्या त्वचेवर लालसरपणा, फुगवटा किंवा फोड येणे हे देखील एक धोक्याचे लक्षण असू शकते.

### नंदा

मेरुपर्वतावर पुष्कर तीर्थी सरस्वती नदी वाहते. तिथे तिला नंदा असेही म्हणतात. त्याची कथा अशी आहे पूर्वी प्रभंजन नावाचा राजा होता. तो पुष्कर वनात शिकारीसाठी आला असता आपल्या पाडसाला दूध पाजणाऱ्या एका हरिणीची त्याने शिकार केली. हरिणीच्या शापाने तो पशुयोनीत जाऊन वाघाच्या जन्माला आला. आजपासून शंभर वर्षांनी नंदा नावाच्या गायीशी तुझे बोलणे होईल व हा शाप संपेल, असे हरिणी म्हणाली. हा वाघ मोठा भयंकर असून रानातील येणाऱ्या जाणाऱ्या प्राण्यांची हिंसा करी.

शंभर वर्षांनी गायींचा एक मोठा कळप तेथे वास्तव्यास आला. त्यातील नंदा नावाची एक गाय भटकत भटकत वाघाजवळ आली. वाघ तिला मारून खाण्याचा विचार करू लागला. घरी असलेल्या वासराच्या आठवणीने ती व्याकूळ झाली. त्याला एकदा दूध पाजून, प्रेमाने चाटून आपल्या सख्यांच्या स्वाधीन करून मग मी स्वतः तुझ्याकडे येईन व मग तू मला खा, अशी नंदाने विनंती केली. वाघाने दयाळू होऊन ती मान्य केली. ठरल्याप्रमाणे ती परत निघाली, तेव्हा इतर गायींनी तिला आत्मरक्षणासाठी खोटे बोलल्यास पाप नाही वगैरे सांगितले. पण सत्य हेच उत्तम तप आहे असे म्हणून नंदा वाघाकडे निघाली.

तिच्या पाठोपाठ तिचा बछडाही आला. त्यांना पाहून गायीचे ते सत्याचे वागणे पाहून वाघाने तिला मारण्याचा विचार सोडला. उलट आजपर्यंत आपण केलेल्या हत्यांच्या पातकातून मुक्त होण्यासाठी उपाय विचारला.

गायीने त्याला कलीयुगाचा जो धर्म दान त्याची आठवण देऊन सर्वांना तू अहिंसेचे दान दे असे सांगितले. वाघाने तिला आपल्या पूर्वजन्मीची हकिगत सांगितली व तिचे नाव विचारले. नंदा नाव ऐकताच प्रभंजनाची शापातून मुक्तता झाली. त्या वेळी सत्यवचनी नंदेचे दर्शन घेण्यासाठी साक्षात यमधर्म तेथे आला व संतुष्ट होऊन वर माग' म्हणाला. ही सरस्वती नदी आजपासून नंदा या नावाने ओळखली जावी व हे स्थान मुलींना 'धर्म प्रदान करणारे तीर्थ व्हावे असा वर तिने मागितला. तिला तिच्या वासरासहित उत्तम पद प्राप्त झाले.

## जीवन का अमृत (भाग १)



हर दुःख, दर्द का यही एक इलाज है। यह स्वर्ग के साम्राज्य का रास्ता खोलने की कुंजी है ।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

७६. समर्थ सतुरु से नामदान ले लेने के बाद, शिष्य का सच्चे घर पहुँचना पक्का हो जाता है । जो नाम लेने के बाद भी पापों और बुराईयों से भरी जिंदगी जीते है और संसार में लिप्त रहते हैं, वे स्त्री या पुरुष के रुप में दोबारा जन्म लेंगे और इस रास्ते की तरक्की को आगे बढ़ाएँगे। पर जिन्हें सतुरु से तीव्र प्रेम है, अटूट विश्वास है और वे तरक्की कर रहे हैं, वे दोबारा जन्म नहीं लेंगे। उन्हें अंतर के निचले मंडलों में बैठा दिया जाता हैं, जहाँ पर सतुरु की सहायता से, वे तरक्की कर अंत में अपने निज घर पहुँच जाते हैं। आमतौर से एक शिष्य इस प्रक्रिया में चार जन्म लेता है, पर यह प्रक्रिया एक जन्म में भी खत्म हो सकती है, जो कि शिष्य के प्रेम, आस्था और सतुरु के आज्ञापालन पर निर्भर करता है।

अध्याय-२ – ध्यान – अभ्यास

१. मुझे खुशी है कि सभा में लगभग १३० व्यक्ति अलग-अलग जगहों से आए और जब आप हर एक का, अपने-अपने स्थान पर बैठने का इंतजार कर रहे थे, तो आपने सतुरु को कमरे में प्रवेश करते हुए और मुड़कर सबकी ओर मुस्कुराते हुए देखा। आपने नामदान से पहले भी सतुरु को आते देखा, पूर्णतया सफेद पोशाक में, सफेद कोट पहने और सबको मीठी मुस्कान देते हुए। सतुरु हमेशा अपने बच्चों के साथ हैं, जो सभी उसे प्यारे हैं। जब एक से ज्यादा भाई-बहन उसकी प्यार भरी याद में मिलते हैं, तो उसकी दया ज्यादा व्यावहारिक हो जाती है और धन्य हैं वे लोग, जो उसकी दया का फायदा उठाते हैं। मुझे खुशी है कि जब भी आप भजन-सिमरन में बैठते हैं, आप सुनहरे प्रकाश में सतुरु को देखते हैं। आप स्वयं को धन्य समझें और अपने आध्यात्मिक अभ्यासों और सतुरु से प्रेम करने में अधिक नियमित और समर्पित हो जाएँ। यह प्रेम, भक्ति और पूर्ण समर्पण का रास्ता है । जब भी आप सतुरु के नूरी और लुभावने स्वरुप को अंतर में देखें, तो उसके प्यारे चेहरे में खो जाएँ, ताकि आप स्वयं को पूरी तरह भूल जाएँ । तब वह आपसे बातें करेगा और आगे आपका मार्गदर्शन करेगा ।

२. आप किसी भी आरामदेह और अटल मुद्रा में बैठ जाएँ, बिना

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अभी संसार नहीं बदल रहा उसका कारण और कुछ नहीं सिर्फ हम मन से नहीं बदले हैं। हम सिर्फ बोलते अच्छा हैं मन से वैसे नहीं हैं। इसलिये लोग भी बोलते अच्छा हैं, करते उल्टा हैं। याद रखो लोग वह बनते हैं, जो आप वास्तव में हैं। न कि वह, जो आप बोलते वा सिखाते हैं। अगर आप डरपोक हैं, आलसी हैं, स्वार्थी हैं, पक्षपाती हैं, प्रचारक हैं, योगी नहीं परंतु क्रोधी हैं, शांत नहीं परंतु ईर्ष्यालू हैं, स्नेही व सहयोगी नहीं हैं तो लोग वही बनेंगे जो आप वास्तव में हैं, चाहे आप कितना भी अपने को छुपा लें। इसलिये अपने मूल गुणों, शांति, प्रेम, सुख, आनंद के संकल्पों में रहो, क्योंकि बिना जाने भी लोग, ईथर के माध्यम से आप से प्रभावित हो रहे हैं।

### आज्ञा चक्र

आज्ञा चक्र – २६- मन- केन्द्र / यंत्र

भगवान ने हरेक मनुष्य को मन के रुप में एक अनमोल खजाना दे रखा है। मन कार्य कैसे करता है, किसी को कोई कुछ पता नहीं। बस सब अपने अपने ढंग से इसकी व्याख्या कर रहे हैं। बहुत अच्छी व्याख्या करते हैं फिर भी परेशान रहते हैं। परेशानी सिद्ध करती है कि मन के ज्ञान की कमी है। विद्युत शक्ति इस विश्व की महान शक्ति है। विद्युत को जब हीटर से गुजारते हैं तो गर्मी उत्पन होती है। विद्युत जब ए.सी. से गुजरती है तो ठंडक पैदा होने लगती है। बल्ब से गुजरती है तो रोशनी होने लगती है। कम्प्यूटर अनेक असम्भव कार्य करने लगता है। मन एक अनोखा कंप्यूटर है। यह अनोखा यंत्र है। इस को आज तक कोई नहीं समझ सका । इसे अगर हम समझ जायें तो इस विश्व और मानव जीवन में क्रांति आ सकती है। हमारे दिमाग में अनेक केन्द्र/यंत्र बने हुये हैं जो स्थूल यंत्रों की तरह काम करते हैं। यह जो पांच विकार हैं जिन्हें हम काम (सेक्स), क्रोध, लोभ, मोह, अहंकार कहते हैं।

वास्तव में ये हमारे मन में यंत्र हैं जिसे हम केन्द्र कह सकते हैं। जैसे ही हमें अपवित्रता की कशिश होती है हमारे विचार काम केन्द्र से गुजरने लगते हैं और इस केन्द्र से ऐसी तरंगे पैदा होती हैं जो विपरीत लिंग के प्रति आकर्षण पैदा करती हैं। जब क्रोध की परिस्थिति आती है तो हमारे विचार क्रोध केन्द्र / यंत्र से गुजरने लगते हैं। इस केन्द्र का स्वभाव है क्रोध पैदा करना जिस से दिमाग गर्म होने लगता है। हम आग उगलने लगते हैं। ऐसे ही लोभ, मोह तथा अहंकार के केन्द्रों/यंत्रों से जब हमारे विचार गुजरते हैं तो वैसा ही वातावरण बनने लगता है। सूक्ष्म विकार ईर्ष्या, द्वेष, नफरत, आलस्य, झूठ बोलना, ग्लानि करना ये सब कुछ नहीं है, ये सब भी यंत्र हैं। हमारे संकल्प जब इनसे गुजरते हैं तो इन यंत्रों के स्वभाव अनुसार ही

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पाहुणे : 'बंडू बाबा घरी आहेत का?'

बंडू : 'मग मी काय मूर्ख आहे, जो अभ्यास करतोय?'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतरत्न मिळविणारी सर्वात वयस्कर व्यक्ती कोण?

– महर्षी धोंडो केशव कर्वे (वय वर्षे १०४)

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

त्यातच 'आम्ही दोघे आमचे एक' अशी त्रिकोणी कुटुंबव्यवस्था काळानुसार बनत चालली आहे. मुलांना उच्च शिक्षण देता यावे. स्वतःचे अस्तित्व निर्माण करावे, करिअरमध्ये उच्च स्थान मिळावे, यासाठी आजच्या आधुनिक काळातील आईला घराबाहेर पडणे अपरिहार्य झाले आहे. स्त्री-पुरुष समानतेची कितीही उदाहरणे आपण मासिक, वर्तमानपत्रे यांच्यामधून वाचली, तरी बालसंगोपनाची जबाबदारी कित्येक वेळा आईवरच लादली जाते व अशा वेळी तिला नोकरी करुन मुलांचे संगोपन करण्यासाठी पाळणाघराची निवड करावी लागते.

### पाळणाघर

अयोग्य पाळणाघर :

१. कमी जागेत जास्तीत जास्त मुले कोंबून ठेवणे. २. अस्वच्छ, कोंदट वातावरण असलेले.

३. पाळणाघरातील सदस्य उदा. तेथील काकू/मावशी, शिक्षिका, मदतनीस, कर्मचारी या स्वभाव रागीट, चिडखोर, तापट असणे.

४. पाळणाघरातील कर्मचाऱ्यांनी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणतेही प्रशिक्षण ऐनको निसणे.

५. पाळणाघराची संचालिका सुशिक्षित व स्वभावाने प्रेमळ नसेल तर.

६. काही लोक फावल्या वेळेत करावयाचा धंदा म्हणूनही पाळणाघर चालवतात.

७. पाळणाघरातील स्वयंपाकघर, खेळण्याची जागा, झोपण्याची जागा स्वच्छ नसेल व अपुरी असेल, तर मुलांना साथीचे आजार होण्याची शक्यता असते. म्हणून अशा प्रकारचे पाळणाघर निवडू नये.

**पाळणाघर निवडताना घ्यावयाची काळजी :** सहसा पाळणाघर हे आपल्या स्वतःच्या घरापासून जवळ निवडावे. म्हणजे ऑफिसमधून येताना मुलांना घरी आणता येते.

✻ पाळणाघर चालविणारी संचालिका ही सुशिक्षित, सुसंस्कृत व स्वभावाने प्रेमळ आहे का, पाहावे.

✻ पाळणाघरातील स्वयंपाक बनविणारी बाई स्वच्छ आहे का, तेथील स्वयंपाकघर स्वच्छ आ का, हे पाहावे.

✻ पाळणाघराची जागा ही मोठी, हवेशीर, प्रशस्त, मुलांना खेळण्यास भरपर जागा, विविध खा. आहेत का, हे पाहावे.

✻ पाळणाघरात असणाऱ्या शिक्षिका, काकू, मावशी, ताई, मदतनीस यांना मुलांमध्ये त्याच्यावर मनापासून प्रेम करण्याची, त्यांच्या कलागुणांना वाव देण्याची उपजतच असावी. मुलांमध्ये रमण्याची उपजतच आवड पाळणाघरातील कर्मचाऱ्यांनी बालविकासाचे प्रशिक्षण घेतलेले आहे की नाही ते पाहावे.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# योग ही निरंतर प्रक्रीया असून ती सातत्याने केली पाहिजे

## डॉ.विश्वासराव मंडलिक यांचे प्रतिपादन; योग विद्या धाम आयोजित यौगिक जीवन पध्दती या विषयावर मार्गदर्शन



योग विद्या धाम आयोजित यौगिक जीवन पध्दती या विषयावर पंतप्रधान योग पुरस्कार प्राप्त योगाचार्य डॉ.विश्वासराव मंडलिक यांचे मार्गदर्शन केले. (छाया – उदय जोशी)

नगर – योग ही निरंतर प्रक्रीया असून ती सातत्याने केली पाहिजे. दररोज योग केला पाहिजे. हे करताना मन प्रसन्न ठेवून केले तरच त्याचे चांगले परिणाम दिसतील. आज प्रत्येकाला काही ना काही ताण तणाव, व्याधी आहेत तसेच अनेकदा नैराश्येचे प्रसंग येतात. त्यातून सावरण्यासाठी योग उत्तम उपाय आहे म्हणून योग हीच जीवनशैली बनवा, असे प्रतिपादन पंतप्रधान योग पुरस्कार प्राप्त योगाचार्य डॉ. विश्वासराव मंडलिक यांनी केले.

योग विद्या धाम आयोजित यौगिक जीवन पध्दती या विषयावर पंतप्रधान योग पुरस्कार प्राप्त डॉ.विश्वासराव मंडलिक यांचे मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. महेश मुळे, डॉ. सुचित तांबोळी, ॲड. सौ.निर्मला चौधरी आदी उपस्थित होते.

मंडलीक पुढे म्हणाले, योगासने व ध्यानधारणा करावी जेणेकरून मनाची एकाग्रता वाढण्यास मदत होईल. मनामध्ये प्रचंड शक्ती आहे. मन एकाग्र केले तर आपल्यात आमुलाग्र बदल होतात, आपल्या आचरणात सुधारणा होते. मानसिक स्थितीवर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. आपला आहार, विहार, विचार सुधारले पाहिजे. शिजवलेले अन्न तीन तासात संपवले पाहिजे. पॅकिंग पदार्थांचा आरोग्याला उपयोग होत नाही. जेवणाच्या वेळा पाळल्या पाहिजे जेवण करताना पोट काही प्रमाणात रिकामे राहीले पाहीजे. काही प्रमाणात द्रव म्हणजे पाणी, आमटी, ताक यांचे प्रमाण गरजेचे आहे. तापशिक्य म्हणजे ताजे पदार्थ शिळे करणारे यंत्र म्हणजे फ्रिज आहे. आज आपण अनेक पदार्थ फ्रिजमध्ये ठेवूनच खातो. फ्रिजचा वापर इमर्जन्सी म्हणून करावा सकाळचा स्वयंपाक सकाळीच संपवला पाहिजे. संध्याकाळचा स्वयंपाक ताजा करून खावा.

डॉ. महेश मुळे यांनी वैद्यक क्षेत्रातील प्रश्न मांडताना लोक आजारी का पडतात कारण आरोग्यक्षेत्राच्या ज्ञानाचा अभाव आहे. प्राचिन आयुर्वेदाने पालेभाज्या निषिद मानल्या आहेत. अमेरिकेतून पालेभाज्याचा प्रचार झाला. आयुवैदिक किंवा योगिक शैली ती आचरली तर अपचन होतच नाही. सर्वात जास्त किटकनाशक पालेभाज्यावरच मारले जातात त्यामुळेच आपल्या शास्त्राविषयी असलेले अज्ञान असणे हा फार मोठा दोष आहे. आपल्या आहारात गाईच्या तुपाचा वापर करा. पोट साफ होण्याकरीता अंत्यत उत्तम आहे. आज व्यायामाचा अभाव दिसतो

प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी शिक्षण क्षेत्रातील प्रश्न मांडताना सांगितले की, मॅक्सन्यूकलर या जर्मन पंडीताने उपनिषदाचा व जीवनशैलीचा अभ्यास केला. तसेच भारतीय जीवनशैली धर्मनिष्ठ पध्दतीची आहे. सनातन धर्मामध्ये सर्वाभूती परमेश्वर आहे, असे सांगितले. या सगळयाचा निष्कर्ष काढला की, जगामधून जोपर्यत ही संस्कृती नाहीशी होत नाही, तोपर्यत जगाला भारतावर राज्य करता येणार नाही. आज पाश्चात्य शिक्षण पध्दती चालू ठेवली आहे. या गुलामगिरीला आधुनिक शिक्षणपध्दतीत खतपाणी घातले आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक समाज या तिन्ही घटकांच्या मानसिक वृत्तीचा अभ्यास करावा लागेल. आम्हीच संशोधित केलेल्या साधनाच्या गर्दीत आम्ही हरवलो आहोत. सर्व आदश जीवनशैली भारतीयानी शोधून काढल्या आहेत त्यावर आलेली सावट, मळभ झटण्याची आवश्यकता आहे.

डॉ. सुचित तांबोळी म्हणाले, आज समाजात मानसिक आजाराचे प्रमाण वाढले आहे. सोशल मिडीया, मोबाईलचा वापराचे दुष्परिणाम दिसत आहेत. याकरीता पालकांनी जागरूक व्हायला हवे

ॲड. सौ.निर्मला चौधरी यांनी कायदेविषयक बोलताना कुंटुबात वादविवादाची कारणे शिक्षणाव्दारे आली आहेत. पूर्वी आईवडील, मोठया माणसांना मानले जात होते त्यांचे ऐकले जात होते. हे संस्कार आज कुटुंबव्यवस्थेतून लोप पावत चालले आहेत. दोन्ही घरात एकमेकांकडून अपेक्षा वाढल्या त्यामुळे दु ख वाढले आहे. या समाजरचनेतून एक दरी निर्माण झाली आहे. दरी व इगो निर्माण झाला आहे. आज मिळतजुळत घेतल्यास कुटुंबव्यवस्थेतील समस्या मिटतील.

योग गीत गायन सौ. पौर्णिमा मंडलिक, सौ. वैशाली एकबोटे आदींने म्हटले. जयश्री हराळे व साजरी परदेशी आणि टीम यांनी योग नृत्य सादरीकरण केले.

योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सौ. संगीता पवार यांनी केले. प्रकल्प प्रमुख श्री व अनिरुद्ध भागवत यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप कुलकर्णी यांनी अल्पोपहार दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व योग शिक्षक, सदस्य व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



शहरातील अहमदनगर यतिमखान्यातील शालेय विद्यार्थ्यांना पै. अफजलभाई फ्रेंड सर्कलच्या वतीने वह्या पुस्तक आदी साहित्य देण्यात आले. यावेळी काविश वस्ताद, मन्सूर सय्यद, फरहान शेख, अजहर शेख, वाहिद बिल्डर, भैया बिल्डर, लाला कुरेशी, जुबेर शेख, वसीम शेख, परवेज शेख, अजीम शेख, अज्जू शेख, फिरोज कुरेशी आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहरात ३ जुलै रोजी बरसणार 'बरसो रे मेघा...'कार्यक्रम

नगर – नगर येथील माऊली सभागृहात हिंदी मराठी चित्रपटातील पावसाच्या गाण्यांचा एक सुरेल, सुमधुर संगीतमय संध्या रंगणार आहे. बरसो रे मेघा मेघा या पावसावर आधारित गाण्यांच्या खास कार्यक्रमाचे आयोजन येथील द ९०'ज टॉकीज व ऑरेंज इव्हेंट्स तर्फे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृह सावेडी येथे होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये भीगी भीगी रातों में, एक लड़की भीगी भागी सी, तुमसा कोई प्यार कोई मासूम नहीं है, दीवानी दिवाना अशा एकाहून एक सरस आणि लोकप्रिय पावसाळी गाण्यांची सुरेल मैफल सादर होणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना डॉ. दमन काशीद यांची असून कार्यक्रमाचे दिग्दर्शन ॲड. सचिन चंदनशिव यांनी केले आहे. संपूर्ण शोचे डिझाईन जालिंदर शिंदे यांनी साकारले आहे.

कार्यक्रमात डॉ. दमन काशीद, ॲड. सचिन चंदनशिव, जालिंदर शिंदे, डॉ. गायत्री कुलकर्णी, रेणुका पवार, पूजा गडकरी, प्रतिभा साबळे, सुशील देठे, डॉ. नितीन जगताप, दिनेश मंजरतकर, प्रशांत बंडगर, महेश घावटे, निलेश महाजन, मोहसिन सैफी, अभिजीत गायकवाड, सागर मेहेत्रे हे गायक कलाकार गाणी सादर करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी ॲड. धनंजय वाघ, सचिन राणे, चांदभाई शेख, प्रा.आदेश चव्हाण, डिझाइनर किरण गवते, अभिषेक शेलार, प्रा. रविंद्र काळे आणि क्षितिज झावरे यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रियाज पठाण तर गाण्यांचे अँकरिंग डॉ. प्राजक्ता सावेडकर यांच्या आकर्षक शैलीत होणार आहे.

पावसाच्या सरींसारखीच हृदयाला ओलावणारी ही संगीत संध्या रसिकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहे. मोफत प्रवेशिकेसाठी पुढील नंबरवर संपर्क करावे ९८८१७२५६९६, ८७९६८६५४८५.

# 'नामाच्या गजरातून अनुभवा आषाढी वारी', ४ जुलै रोजी माऊली सभागृहात कार्यक्रम

नगर – पावसाच्या आगमनाने सारी सृष्टी बहरून जात असताना वेध लागतात ते आषाढी एकादशीचे. या एकादशीच्या दिवशी पंढरपूरला जाण्याचे भाग्य प्रत्येकालाच लाभते असे नाही– अशा सर्वांसाठी नामाचा गजर ऐकून त्या वारीची अनुभूती घेता येईल. अहिल्यानगर मधील कलाकार अनिरुद्ध धर्माधिकारी यांच्या गायनातून व प्रसिध्द निवेदिका सौ. स्नेहल उपाध्ये यांच्या निवेदनातून अभंग आणि भक्ति संगीताचे अमृत बोल अनुभवता येणार आहेत. हार्मोनियम वादक मकरंद खरवंडीकर, तबला वादक शेखर दरखडे, चि. अनुज दरवडे तालवाद्यावर तर सत्यजीत सराफ हे सिंथेसायझरवर साथसंगत करणार आहेत.

आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला या कार्यक्रमातून विठ्ठलाचा धावा होणार आहे. अवघा रंग एक झाला याची अनुभुती पंढरपूरला न जाता सुद्धा होणार आहे.

सदर कार्यक्रम माऊली सभागृहात ४ जुलै रोजी सायं. ५.३० वा आयोजीत केला आहे. कार्यक्रमास रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे.

प्रेक्षकांनी उपस्थित रहावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ डिग्निटी, अहिल्यानगर तर्फे करण्यात आले आहे.

# सुब्रतो मुखर्जी आंतरराष्ट्रीय फुटबॉल कप स्पर्धेसाठी प्रवेशिका ६ जुलैपर्यंत सादर करा : क्रिडाधिकारी

नगर – ६४ व्या सुब्रतो मुखर्जी आंतरराष्ट्रीय फुटबॉल कप (ज्युनिअर व सबज्युनिअर) स्पर्धा २०२५–२६ चे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांनी आपली प्रवेशिका ६ जुलै पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सादर करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महानगरपालिका, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण जिल्हास्तर आणि महानगरपालिकास्तरावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी www.subrotocup.in या संकेतस्थळावर संघ व खेळाडूंची नोंदणी करणे आवश्यक आहे.

प्रत्येक सहभागी संघाने २,००० रुपयांचे प्रवेश शुल्क भरलेले असावे. प्रवेश शुल्क भरलेल्या आणि ऑनलाइन नोंदणी पूर्ण केलेल्या संघांनाच स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल.

प्रवेशिका जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे प्रत्यक्ष किंवा ८०८७०७६६३३ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवाव्यात.

सबज्युनिअर गटासाठी सहभागी खेळाडूचे वय १४ वर्षांखालील असावे, म्हणजेच १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले विद्यार्थी पात्र ठरतील.

ज्युनिअर गटासाठी सहभागींचे वय १७ वर्षांखालील असावे, म्हणजेच १ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले विद्यार्थी पात्र असतील.

माहितीसाठी ८०८७०७६६३३, ८३६९५३९०७७ किंवा ९४२०७९६१४०.

# केअर फॉर यु आयोजित 'हंट फॉर द सिक्रेट सुपरस्टार' स्पर्धेत राज्यातील शेकडो वंचित विद्यार्थी सहभागी



केअर फॉर यू च्या वतीने घेण्यात आलेल्या काढण्यासाठी 'हंट फॉर द सिक्रेट सुपरस्टार' स्पर्धेची उपांत्य फेरी अहिल्यानगरमध्ये झाली. यावेळी महिला व बालविकासचे पुणे विभागाचे सहाय्यक आयुक्त राहुल मोरे व नाशिकचे उपायुक्त चंद्रशेखर पगारे, गीतांजली वर्मा, अनुराग धुत व वैशाली धूत, करीम हुंडेकरी, सी.ए.पायल राठी, सी.ए. रोशन राठी, स्मिता सारडा आदींसह सहभागी विद्यार्थी.

नगर – वंचित घटकांसाठी काम करणाऱ्या केअर फॉर यु या सामाजिक संस्थेच्या व शासनाच्या महिला व बालविकास संस्थेच्या सहकार्याने राज्यातील अनेक अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यां मधील सुप्त कलागुणांना शोधून ते बाहेर काढण्यासाठी 'हंट फॉर द सिक्रेट सुपरस्टार' या राज्यस्तरीय स्पर्धेच्या उपांत्य फेरीचे आयोजन अहिल्यानगरच्या हुंडेकरी लॉन येथे झाले. स्पर्धेसाठी राज्यातील ४१ विविध संस्थांमधील २४० वंचित विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. गायन, चित्रकला, क्राफ्ट व सामान्य ज्ञान या चार विभागात अत्यंत चुरशीच्या या स्पर्धा झाल्या. यामध्ये विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून प्रशिक्षण, चित्रकला व क्राफ्ट चे साहित्य व जनरल नॉलेजची पुस्तके मोफत पुरवण्यात आली.

उपांत्य फेरीतील विजेत्यांना नगर येथील आर्मी अधिकारींच्या पत्नी गीतांजली वर्मा, पुणे विभागाचे महिला व बालविकास सहाय्यक आयुक्त राहुल मोरे व नाशिकचे उपायुक्त चंद्रशेखर पगारे, इपिटोम कंपनीचे संचालक व श्रीगोपाल रामनाथ धूत ट्रस्टचे विश्वस्त अनुराग धुत व वैशाली धूत, करीम हुंडेकरी आदी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. केअर फॉर यु संस्थेच्या सी.ए.पायल सारडा राठी, सी.ए. रोशन राठी, स्मिता सारडा, पवन गांधी, सिद्धार्थ घोंगडे, स्मिता घैसास, राकेश भागानगरे, स्वरा वासानी, स्वराली डेरे, श्रेया भापकर व नेहा पुत्रन आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

राहुल मोरे म्हणाले, शासन प्रत्येक ठिकाणी सोयीसुविधा देण्यासाठी पोहचु शकत नाही. अशावेळी केयर फॉर यू सारख्या संस्था पुढे येतात व वंचित घटकांसाठी भरीव योगदान देत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम करत आहे. राज्यातील वंचित विद्यार्थ्यांसाठी घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. जे विद्यार्थी स्पर्धेतून बाहेर पडले आहेत अशांनी खचून न जाता चार पावले मागे टाकावीत व पुन्हा चांगला सराव करून यशाकडे झेप घ्यावी, असे आवाहन केले.

वैशाली धूत म्हणाल्या, ही स्पर्धा चारही विभागांमध्ये उत्कृष्टपणे घेण्यात आली. या स्पर्धेतून विद्यार्थी जे शिकले आहेत त्यावर भरपूर मेहनत व सराव करून जीवनात या कलेच्या जोरावर आदर्श नागरिक किंवा कलाकार व्हावे. केअर फॉर यु सारख्या निस्वार्थी व सेवाभावी उपक्रमांना श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन कायम सहकार्य करणार आहे.

करीम हुंडेकरी म्हणाले, लहानपणापासूनच स्पर्धांमध्ये जिंकण्याची जिद्द बाळगा. केअर फॉर यु ने या स्पर्धेच्या माध्यमातून तुमच्यात जिद्द निर्माण केली आहे. सीए पायल सारडा राठी या उत्कृष्ट काम करत असून, अशा चांगल्या उपक्रमांसाठी हुंडेकरी लॉन्स कायम नि:शुल्क उपलब्ध ठेवणार आहे.

प्रस्ताविकात सी.ए.पायल राठी म्हणाल्या, गेल्या पाच सहा वर्षांपासून हंट फॉर द सीक्रेट सुपरस्टार स्पर्धेचे आयोजन करत आहे. स्पर्धेतील अंतिम फेरीतील विजेत्यांना कला व गायन क्षेत्रात करिअर करण्यासाठी पूर्ण प्रशिक्षण देत सहकार्य करत आहोत. यापूर्वी १२ गायन व २५ जनरल नॉलेज च्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची पूर्ण जबाबदारी संस्थेने घेतली आहे. यावर्षी साधारण १०० विद्यार्थ्यांची शैक्षणिक जबाबदारी केअर फॉर यू घेणार आहोत. या उपक्रमासाठी अनेकांनी सहकार्य आम्हाला केले आहे व त्यामुळेच हे शक्य होत आहे. उपांत्य फेरीतील विजेत्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे, गायन स्पर्धा प्रथम त्रिशा खरात (आंतरभारती बालग्राम लोणावळा), द्वितीय परी माळी (बी.जे. एस. स्कूल वाघोली) व तृतीय ओमकार शिशुपाल (दादू काका भिडे बॉईज होम सांगली). चित्रकला स्पर्धा प्रथम मनोज पाटील (डी. एन. सीरूर बालकाश्रम मुंबई), द्वितीय सुरज गाडे (बालविकास प्रतिष्ठान बीड) व तृतीय विशाल संसरे (आदित्य केअर सेंटर मुंबई). या स्पर्धेसाठी अशोक डोळसे, पवन नाईक, सुजाता पायमोडे, सुजाता कुलकर्णी, सोनाली शितोळे, सचिन घोडे व प्राजक्ता देशपांडे यांनी परिक्षक म्हणून काम केले.



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या अहिल्यानगर केंद्रात केंद्रात उज्वल यश संपादन केलेल्या 'नृत्य झंकार' च्या विद्यार्थिनी समवेत मार्गदर्शिका सौ. प्रिया ओगले –जोशी.

# कथक नृत्य परीक्षेत नगर येथील नृत्यझंकारचे यश

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालया मार्फत झालेल्या कथक नृत्य परीक्षेत नगर येथील नृत्यझंकार नृत्य वर्गाने उज्वल यश संपादन केले. तसेच अहिल्यानगर केंद्रात अव्वल स्थान पटकाविले. सर्व मुली चांगल्या मार्कमिळवून पास झाल्या. क्लास चा निकाल १०० टक्के लागला. प्रथम श्रेणी व विशेष प्राविण्य विद्यार्थांनी मिळवले.

अहिल्यानगर केंद्रात स्थान प्राप्त केलेल्या विद्यार्थिनी प्रारंभिक (प्रथम वर्ष) कु.अधिरा भापकर. प्रथम क्रमांक दिशा भोर व अमृता कुलकर्णी, द्वितीय क्रमांक सानवी भोर, गौरवी बारवकर व सार्थिका पानसरे, सविता मदने, भक्ती क्षीरसागर, तृतीय क्रमांक प्रवेशिका प्रथम (द्वितीय वर्ष) जिया कटारिया –प्रथम क्रमांक, सिया सातपुते–द्वितीय क्रमांक स्पर्शिका नागापुरे व विदिशा गुगळे द्वितीय स्वरा मुटकुळे – तृतीय क्रमांक मध्यमा पूर्ण (पाचवे वर्ष) तेजस्विनी येनगंदूर –प्रथम क्रमांक अनुष्का बडवे –द्वितीयक्रमांक श्रावणी मुळे –तृतीय क्रमांक

सर्व मुलींना 'नृत्यझंकार' नृत्य वर्गाच्या संचालिका प्रिया ओगले–जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. या परिक्षेत ८ ते ५० वर्ष वयाच्या विद्यार्थीनि होत्या. क्लासचे अनेक कार्यक्रम जिल्हा राज्य व राष्ट्रीय पातळी तसेच टीव्ही शो मधून होत असतात.

५ जुलै विठूरंग हा आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला कार्यक्रम ऊर्जा रंगभवन येथे होत आहे. कार्यक्रम विनामूल्य आहे.

# पवन नाईक स्वरानुभूती विद्यापीठात रंगली



निनाद फाउंडेशन संचलित निनाद संगीत विद्यालय महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे २९ जून रोजी स्वरानुभूतीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांचे गायन व ग्वाल्हेर घराण्याचे गायक पवन श्रीकांत नाईक यांची स्वरानुभूती संगीत मैफल अशा दोन सत्रात हा कार्यक्रम पार पडला.

नगर – निनाद फाउंडेशन संचलित निनाद संगीत विद्यालय महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे २९ जून रोजी स्वरानुभूती चे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांचे गायन व ग्वाल्हेर घराण्याचे गायक पवन श्रीकांत नाईक यांची स्वरानुभूती संगीत मैफल अशा दोन सत्रात हा कार्यक्रम पार पडला. निमित्त होते अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई द्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये यश संपादित केलेल्या सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या संगीत गायक व वादक, विद्यार्थ्यांचा गुणगौरव व त्या अनुषंगाने ज्येष्ठ कलाकारांची कला प्रस्तुती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख व पवन नाईक यांचे हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. जयंत कुलकर्णी, डॉ. पवन कुलवाल, डॉ. अधीर आहेर, प्रकाश मोरे, संगीत शिक्षक डॉ. मनोज तेलोरे, राजेंद्र कोतकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात निरंजन कुसळकर, आदित्य लांडगे, अर्णव कोकणी यांचे समूह तबला वादन झाले. यांनी ताल तीनतालात पारंपारिक सादरीकरण केले. नंतर सुबोध गायकवाड याने राग भूप बंदिश, सिद्धी देवरे हिने राग यमन व सांज ये गोकुळी (भावगीत) तसेच भीमपलास या रागात समूह गायन करताना सई देशमुख, नम्रता कुसळकर, अक्षरा कुलकर्णी यांनी छोटा ख्याल, सरगम गीत व सुंदर ते ध्यान हे भजन इ. रचना सादर केल्या.

स्वरानुभूती या द्वितीय विशेष सत्रात पवन नाईक यांनी तूम बिन चैन, लट ऊलझी, भोला शंकर, अलबेला सजन, बाहुली आली, नाई बा कृष्णा, किन्ना सोणा व सासो की माला अशा रचना सादर केल्या. राग शिवरंजनी, अहिर भैरव, मिश्र किरवाणी, बिहाग, राग गौरी अशा विविध रागातील ख्याल, भक्तिगीते, गवळण, भारूड व सूफी रचनांनी विद्यार्थी तसेच श्रोते मंत्रमुग्ध झाले.


साथसंगत कल्याण मुरकुटे (संवादिनी), शेखर दरवडे (तबला) तसेच नवरतन वर्मा, संकेत गांधी, श्रेयस शित्रे, पवन तळेकर व जयंत पाठक (सहगायन) यांनी साथसंगतीतून विशेष रंगत भरली. मनोज तेलोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राजेंद्र कोतकर यांनी आभार मानले. कार्यक्रम सूत्रसंचालन राजेंद्र कोतकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिद्धार्थ साळवे, डॉ. जयंत कुलकर्णी, राजेंद्र नेवासकर, कमलाकर इंगळे, बापुसाहेब तेलोरे, बबन साळवे, महेश बिडवे, सुदाम कोहकडे, शुभदा कुलकर्णी, प्राची गायकवाड, डॉ. खरे, संध्या जोशी व डॉ. कुसळकर आदींचे सहकार्य लाभले. पांडुरंग कुसळकर, भगवान देशमुख, संदीप लांडगे, विवेकानंद कुलकर्णी, नंदकुमार भुते, गणेश गायकवाड, मुकेश कोकणी, दिलीप कुलकर्णी, रविंद्र देवरे, सुभाष घोडके, भाईदास देवरे आदि उपस्थित होते.

# सामाजिक बांधिलकी म्हणून वह्यांचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा एक छोटासा हातभार

### डॉ.अशपाक पटेल यांचे प्रतिपादन; राणी सुलताना चांदबीबी पुण्यतिथीनिमित्त मख़दुम सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे मोफत वह्या वाटप

नगर – राणी सुलताना चांदबीबी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना ही आदरांजली वाहतानाच त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनातून आपण शिकण्यासारखं खूप काही आहे. त्यांनी आपल्या शौर्य, बुद्धिमत्ता आणि नारीशक्तीचा उत्तम आदर्श आपल्या पुढे ठेवला. चांदबीबी यांच्या स्मरणार्थ मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी आणि रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या वतीने एक छोटासा पण अर्थपूर्ण उपक्रम राबवित आहेत तो म्हणजे विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप. हा उपक्रम म्हणजे केवळ वह्यांचे वाटप नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकी, शिक्षणाविषयीची जाणीव आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा एक छोटासा हातभार आहे, असे प्रतिपादन पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ. अशपाक पटेल यांनी केले.



अहमदनगर छावणी परिषदेच्या महात्मा गांधी शाळेत विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशफाक पटेल, तौफिक तांबोली, मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान आदी.

अहमदनगर छावणी परिषदेच्या महात्मा गांधी शाळेत विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशफाक पटेल, अल करम हॉस्पिटलचे तौफिक तांबोली, मख़दुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, शिक्षिका सुमैय्या सय्यद, अरविंद कुडीया, शेख नविद्दुसहर व मुबीना सय्यद आदी उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात शफी हज उमरा टुर्स, राजकुमार गुरनानी, युनूसभाई तांबटकर, लालाभाई शेख, विकास पिटेकर, चारु ससाणे, कांचन तांबोळी, डॉ. शैलेंद्र खंडागळे, अर्जुन चौरे, सुरेश पवार, नरेश पेवाल, सारीका रघुवंशी यांनी सहकार्य केले.

प्रस्ताविक करताना आबिद खान म्हणाले की, या वह्या म्हणजे केवळ पानं नाहीत, तर तुमचं स्वप्नं लिहिण्यासाठीची एक संधी आहे. अभ्यास करा, प्रगती करा, आणि आपल्या ज्ञानाने आपल्या कुटुंबाचे, शहराचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करा. शेवटी, राणी चांदबीबींसारख्या वीरांगनेची आठवण ठेवत, आपणही समाजासाठी काहीतरी चांगले करू शकतो ही भावना जपूया. असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमैय्या सय्यद यांनी केले. अरविंद कुडीया यांनी आभार मानले.

# लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षपदी डॉक्टर संजय आसनानी

### सचिवपदी प्रशांत मुनोत व खजिनदारपदी दिलीप कुलकर्णी यांची नियुक्ती



नगर – लायन्स क्लब ऑफ अहमदनगरची वर्ष २०२५–२६ ची नूतन कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी डॉ. संजय आसनानी, सचिवपदी प्रशांत मुनोत व खजिनदारपदी दिलीप कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली.

लायन्स क्लब ही जागतिक दर्जाची असलेली सेवाभावी संस्था आहे. क्लबचे २१० देशामध्ये १५ लाख सभासदांच्या माध्यामातून सामाजिक कार्य सुरु आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. कोरोना काळात क्लबने घर घर लंगर सेवेच्या माध्यामातून मोठे कार्य केले, तसेच मागील वर्षी कन्यादान, महिला सक्षमीकरण, युवतींना स्वसंरक्षणाचे धडे व गरजू मुलींसाठी सायकल वाटप आदी उपक्रम राबविले. या उपक्रमाची दखल इंटरनॅशनल लायन्सने घेऊन क्लबला वॉर्डने देखील सन्मान केला आहे. दरवर्षा प्रमाणे जूनमध्ये नवीन कार्यकारणी जाहिर करण्यात आली असून, क्लबच्या माध्यमातून सामाजिक उद्दीष्ट समोर ठेऊन वर्षभर सामाजिक कार्य केले जाणार असल्याची माहिती अध्यक्ष डॉ. संजय आसनानी यांनी दिली.

डॉ. संजय आसनानी हे मॅक्सो फेशियल सर्जन आणि दंत चिकित्सक आहेत. मागील २५ वर्षापासून दंत सेवा देत आहे. ते लायन्सचे मागील १६ वर्षापासून सक्रीय सदस्य आहे. यापूर्वी त्यांनी लायन्स क्लबचे जबाबदारीचे पद भूषवले आहे.

प्रशांत मुनोत हे उद्योजक असून ते रेल्वे सल्लागार समितीचे माजी सदस्य आहेत. सामाजिक क्षेत्रात आणि लायन्स मध्ये ते मागील १७ वर्षापासून कार्यरत आहेत.

दिलीप कुलकर्णी हे क्लबचे ज्येष्ठ सदस्य असून, इन्शुरन्स प्रतिनिधी आणि वाहन सल्लागार आहेत. ते देखील मागील २५ वर्षापासून लायन्सच्या सामाजिक चळवळीत योगदान देत आहेत.

# रोटरी क्लब डिग्निटीच्या अध्यक्षपदी डॉ.सोनाल भालसिंग तर सचिवपदी ॲडव्होकेट अभिषेक भगत यांची नियुक्ती





नगर – रोटरी क्लब ऑफ डिग्निटी या संस्थेच्या २०२५ व २६ या वर्षाच्या अध्यक्षपदी अहिल्यानगरचे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सोनाल भालसिंग व सचिवपदी ॲड. अभिषेक भगत यांनी नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ.सोनाल भालसिंग हे अनेक वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात योगदान देत असून आजपर्यंत हजारो रुग्णांवर उचार केले आहेत. विविध सामाजिक उपक्रमांसह रोटरी क्लब डिग्निटीच्या विविध सेवा कार्यातही त्यांचा हिरीरीने सहभाग असतो.

ॲड.अभिषेक भगत हे बुऱ्हाननगरच्या तुळजाभवानी मंदिराचे पुजारी असून गेल्या अनेक वर्षांपासून वकिली, क्रीडा व आध्यात्मिक क्षेत्रात योगदान देत आहेत. अहमदनगर बार असोसिएशनचे सचिव म्हणून दोन वेळा त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. तसेच जिल्हा तालीम संघाचे उपाध्यक्ष व नगर तालुका कार्याध्यक्षपदी काम करत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून देखील जबाबदारी सांभाळली आहे.

रोटरी क्लब भारतासह २०० देशांमध्ये सामजिक जाणीवेतून काम करत आहे. हे काम आपल्या अहिल्यानगरमध्येही उत्साहात व उत्स्फूर्तपणे सुरु आहे. पदाच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजूंपर्यंत पोहचून त्यांच्या गरजा पूर्ण करण्यास प्राधान्य देणार आहे, अशी माहिती अध्यक्ष डॉ.सोनाल भालसिंग व सचिव ॲड.अभिषेक भगत यांनी दिली.

# निसर्गाचा समतोल राखला तर आपण निरोगी आयुष्य जगू

### डॉ. चंद्रवदन मिश्रा यांचे प्रतिपादन; अनाम प्रेम संस्थेच्या मुलांबरोबर डॉक्टर डे साजरा

नगर – मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड यामुळे मानवी आरोग्यावर याचा मोठा परिणाम झाला आहे. आरोग्य अबाधित राखायचे असेल तर झाडे वाचली वाचवली पाहिजे. निसर्गाचा समतोल राखला तर आपण निरोगी आयुष्य जगू असे इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रवदन मिश्रा म्हणाले.




इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने एमआयडीसी येथील स्नेहालया मधील अनाम प्रेम संस्थेतील मुलांची आरोग्य तपासणी करून डॉक्टर डे साजरा करण्यात आला. (छाया – समीर मन्यार)

एमआयडीसी स्नेहालय येथील अनाम प्रेम संस्थेबरोबर इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने डॉक्टर डे उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेतील मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आले. यावेळी डॉ. चंद्रवदन मिश्रा, उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र वानखडे, डॉ. सचिन पांडुळे, सचिव डॉ. मुकुंद तांदळे, खजिनदार डॉ. सुरेंद्र रच्चा, सदस्य डॉ. पियूष मराठे, डॉ. राहुल गाडेकर, डॉ. सचिन बुधवंत, डॉ. अनिलकुमार सिंग, डॉ. श्रेयस सुरपूरे, डॉ. उज्वला शिरसाठ, डॉ. प्रशांत पटारे, डॉ. सारंग बोरुडे, डॉ. सोनल बोरुडे, डॉ. दिपाली अनभुले, डॉ. अमित करडे, डॉ. अविनाश वारे, डॉ. तृप्ती सिंग, व्यवस्थापक विशाल येमुल आदींसह शहरातील डॉक्टर्स उपस्थित होते.

चंद्रवदन मिश्रा म्हणाले की सालाबाद प्रमाणे याही वर्षी स्नेहालय येथे अनामप्रेम संस्थेतील मुलांबरोबर डॉक्टर डे साजरा करण्यात आला. यावेळी मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषध उपचार करण्यात आले. डॉक्टर डेनिमित्त परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र वानखडे, डॉ. सचिन पांडुळे, सचिव डॉ. मुकुंद तांदळे, खजिनदार डॉ. सुरेंद्र रच्चा यांनी मनोगत व्यक्त करून आरोग्य बरोबरच निसर्गाचे संवर्धन याचे महत्त्व मुलांना पटवून दिले. डॉ चंद्रवदन मिश्रा, साई एशियन हॉस्पीटल, वानखडे हॉस्पीटल आणि शिल्ड फार्मा यांच्याकडून मोफत औषधे देण्यात आली.

# शिलाविहार येथे ३ जुलैपासून गुरुपौर्णिमेचा सप्ताहास प्रारंभ



नगर – सावेडी उपनगरात शिला विहारला श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरुपोर्णिमेचा अखंड हरिनाम सप्ताह गुरुवारपासून प्रारंभ होत आहे. ३ ते १० जुलै पर्यंत या सप्ताहात भागवत कथा होणार आहे.

यात २४ तास श्रीराम जय राम जय जय राम हा जप सेवाभावी मंडळाचे सदस्य करणार आहेत. भाविकांना श्री गोंदवलेकर महाराज यांचे चरित्र ग्रंथाचे वाचन करायचे असेल त्यांनी सकाळी ९ ते ११ या वेळेत पारायण सोहळ्यास उपस्थित राहावे. ज्या भाविकांना ग्रंथ पाहिजे त्यांनी विजय मते (९२ २५ ३२ २३ ८९) संपर्क करावा. व्यासपीठ चालक मनीषा भोंग आहेत. या पारायण सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन हभप सुंदरदास रिंगणे यांनी केले आहे.

या सप्ताह मध्ये पुणे येथील भागवत कथाकार विनायक पारखे शास्त्री कथा निरूपण करणार आहेत. ३ ते १० जुलै पर्यंत गोंदवलेकर महाराज मंदिरात दर एक तासाने भाविक नामजपास बसतील पहाटे ५ ते ७ रुद्राभिषेक, सकाळी ९ ते ११ ग्रंथ वाचन, ११ ते १२ भजन दुपारी १२:३० वा.आरती होऊन दुपारी २ पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. दुपारी ३ ते ६ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० पंचपदी भजन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. भाविकांनी या सर्वांचा लाभ घ्यावा, असे हभप रेखाताई रिंगणे यांनी सांगितले. १० जुलै रोजी सकाळी ९ ते ११ हभप किशोर महाराज कोकाटे (आळंदी) यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल.



शहरातील सीए, डॉक्टर्स व शेतकऱ्यांचा सत्कार करताना संचालक किशोर व प्रमोद गांधी आदी.

# डॉक्टर, सी. ए. व शेतकरी हे समाजासाठी कायमचे भूषण

### दिशान ॲडस्‌चे संचालक किशोर गांधी यांचे प्रतिपादन

नगर – १ जुलै हा दिवस शुभ दिन आहे. या दिनानिमित्त डॉक्टर, सी.ए., शेतकरी यांचा प्रातिनिधिक सत्कार व सन्मानाचा कार्यक्रम नक्षत्र लॉन्स येथे पार पडला. ही सर्व मंडळी समाजाचे भूषण आहेत. तिनही क्षेत्रातील मंडळी आपापले कर्तव्य चोखपणे बजावून समाजासाठी उपयुक्त काम करतात. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणजे हा छोटेखानी सन्मान कार्यक्रम आहे, असे किशोर गांधी यांनी सांगितले.

दिशान, अनामिका ॲडस्‌च्यावतीने हा सत्कार सोहळा घेण्यात आला.

सत्कारार्थी आयुर्वेदाचार्य डॉ. विलास जाधव हे खेड्यापाड्यात जावून गरजू रूग्णांना वैद्यकीय सेवा देत आहेत. तसेच निंबळक येथील निसर्गसृष्टी गोशाळेचे अध्यक्ष म्हणून ते निरपेक्ष काम पाहतात. गोमातेच्या सेवेचा एक वटवृक्ष निर्माण होत असून सुमारे ४०० गायींचा याठिकाणी सांभाळ केला जातो.

सी.ए.नगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद पुराणिक हे आर्थिक विषय हाताळतानाच आध्यात्मिक भक्ती सेवाही करतात. ते दत्तभक्त आहेत. सी.ए.ज्ञानेश कुलकर्णी हे आपल्या व्यवसायासह वृत्तपत्राची जबाबदारीही पार पाडतात. त्यांचे आयएमएस संस्थेत अध्यापनाचे कौशल्यही कौतुकास्पद आहे.

सी.ए.महेश भळगट हे जैन समाजाच्या विविध धार्मिक व सामाजिक सेवेत सक्रिय योगदान देत असतात. कृषी क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी वडिलोपार्जित शेती सांभाळत ती वाढवली आहे. याशिवाय राजकारण, समाजकारणातही मोलाचं कर्तृत्व सिद्ध केले आहे. किशोर गांधी यांनी सत्कार केला. प्रमोद गांधी यांनी आभार मानले.

# ‘सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल’ची नगरमध्ये उज्ज्वल यशाची परंपरा कायम







नगर – सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल अहमदनगर येथे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत ॲडव्हान्स डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (PGDMLT) कोर्स चालविला जातो. नुकतेच उन्हाळी परीक्षा २०२५ चा निकाल लागला असून यामध्ये सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. खेडेकर सोमनाथ प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहे तसेच देवकर मोनाली व निमसे सिद्धार्थ यांनी द्वितीय क्रमांक तसेच बोसावे राजेंद्र, आंधळे स्मिता, महाजन रामेश्वरी, मुनेश्वर प्रणाली, धाडगे प्रतीक्षा, जाधव गोविंद, खाडे शुभम, पालवे वैभव हे तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष लुंकड सर, संचालक हिरालाल लुणावत, प्रा. सुरकुटला सर, प्रा. किरण पवार व मनीषा बोरा, ओंकार बेल्हेकर व मयूरी तिवारी आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सन २०२५–२६ चे प्रवेश चालू झाले असून सिद्धी इन्स्टिट्यूट ऑफ पॅरामेडिकल अहमदनगर येथे प्रवेश घेण्यासाठी ७२७६८१३१९९, ९४२०३ ९५४९९, ९१४५१५५७५५, ९१४६७५५९५५, ९११२७५५९५५, या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन हिरालाल लुणावत यांनी केले.

## नगर अर्बन बँकेतील ठेवीदारांसाठी ग्राहक सहाय्यता केंद्र

नगर – नगर अर्बन बँकेतील सर्व ठेवीदारांना कळविण्यात येते की, ५ लाख रुपयांवरील ठेवींचे वितरण बँक लवकरच सुरू करणार आहे. यासंदर्भात ठेवीदारांना यादीतील नाव समाविष्ट आहे की नाही, हे पाहण्यासाठी नगर अर्बन बँकेच्या प्रधान कार्यालयातील क्रमांकावर ०२४१–२३४३६४१, २३४३६४२ मिलिंद अंचवले यांच्याशी सकाळी १०.३० ते सायं. ५ या कार्यालयीन वेळेत संपर्क करावा, असे आवाहन बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी (मो. ९४२३७९३३२१) यांनी केले आहे.



काकासाहेब मेमोरिअल मेडिकल फौंडेशनतर्फे श्री क्षेत्र सिध्देश्वर देवस्थान भामाठाण (ता.श्रीरामपूर) येथील दिंडीतील वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

# वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

### म्हस्के फौंडेशनचा उपक्रम; चारशेहून अधिक जणांची सेवा

नगर – काकासाहेब मेमोरिअल मेडिकल फौंडेशनतर्फे श्री क्षेत्र सिध्देश्वर देवस्थान भामाठाण (ता.श्रीरामपूर) येथील दिंडीतील वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी चारशेहून अधिक वारकऱ्यांची आरोग्य सेवा करण्यात आली. त्यांना औषधांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी फौंडेशनचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के, विश्वस्त डॉ.सुमती म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ. दिप्ती ठाकरे, सीईओ समीर ठाकरे, होमिओपॅथी कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक रेगे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य संदीप बडधे, नर्सिंग इन्स्टिट्युटचे प्राचार्य प्रा. अजित चवरदार, वैद्यकीय अधिकारी डॉ.अबोली कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ.म्हस्के म्हणाले, फौंडेशनच्या माध्यमातून २५ वर्षांपासून वारीतील वारकऱ्यांच्या सेवा केली जाते. म्हस्के परिवाराची आरोग्य सेवेची ही परंपरा अखंडपणे सुरु आहे. श्री विठुरायाच्या पायी दिंडीने समाजामध्ये अध्यात्मिकतेची भावना अधिक बळकट होते. हजारो वर्षांची ही परंपरा समाजाला नवी दिशा देणारी ठरत आहे. वारकरी सांप्रदायाच्या भक्तिभावात सामाजिक ऐक्य, संयम व निस्वार्थ सेवेचा आदर्श उभा राहत असल्याचे ते म्हणाले.

# प्रशिक्षण घेऊन महिलांनी स्वत:चे उद्योग व व्यवसाय उभे करावे

### बाळासाहेब पवार यांचे प्रतिपादन; महिला व युवतींसाठी ब्युटी पार्लर ॲण्ड हेअर कट प्रशिक्षणाचे उद्‌घाटन, स्किल इंडिया मिशन अंतर्गत महिला सक्षमीकरणाचा उपक्रम

नगर – शासनाच्या वतीने महिलांसाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले असून, महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी ते उपयुक्त ठरत आहे. जनशिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण सुरु आहे. प्रशिक्षण घेऊन महिलांनी स्वत:चे उद्योग व व्यवसाय उभे करावे. संस्थेच्या माध्यमातून फक्त प्रशिक्षण देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना उद्योग व्यवसाय उभे करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग व प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या माध्यमातून कर्ज देखील उपलब्ध करून दिले जात असल्याचे बाळासाहेब पवार यांनी सांगितले.



नैना मेक ओव्हर ॲण्ड ॲकॅडमीच्या वतीने ब्युटी पार्लर ॲण्ड हेअर कट प्रशिक्षणाचे उद्‌घाटन करण्यात आले.

कौशल्य विकास व उद्योजक मंत्रालय संचलित जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सावेडी, नंदनवननगर येथील नैना मेक ओव्हर ॲण्ड ॲकॅडमीच्या वतीने ब्युटी पार्लर ॲण्ड हेअर कट प्रशिक्षणाचे उद्‌घाटन करण्यात आले. महिला व युवतींमधील कौशल्य विकसीत करुन महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने स्किल इंडिया मिशन अंतर्गत हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणाला महिलांसह युवतींचा प्रतिसाद लाभला.

या ब्युटी पार्लर ॲण्ड हेअर कट प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी रतन कानडे, सौ. रोशन कानडे, कार्यक्रम अधिकारी शफाकत सय्यद, प्रशिक्षिका नयना कानडे आदींसह महिला व युवती उपस्थित होत्या.

रतन कानडे म्हणाले की, महिला आर्थिक सक्षम झाल्यास ते कुटुंब आपली प्रगती झपाट्याने साधू शकते. महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून, उद्योग, व्यवसायात देखील महिला पुढे येत असल्याचे सांगून महिलांना प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

शफाकत सय्यद यांनी प्रास्ताविकात जन शिक्षण संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

या प्रशिक्षणात प्रत्येकी २० महिलांचे दोन बॅच करण्यात आलेल्या आहेत. तीन महिने यामध्ये महिला व युवतींना ब्युटी पार्लर ॲण्ड हेअर कटचे अद्यावत प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षिका नयना कानडे यांनी प्रशिक्षणाची माहिती देऊन महिला–युवतींना या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सिताराम सारडा विद्यालयातील मयत विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना हिंद सेवा मंडळाने १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करावे

## कुटुंबियांची सांत्वनपर घेतली भेट, जिल्हा पोलीस अधीक्षकांसह प्रशासनाला निवेदन देत उपयोजनांची केली मागणी



ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे व पदाधिकाऱ्यांनी सिताराम सारडा विद्यालयातील मयत विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.

नगर – हिंद सेवा मंडळाच्या सिताराम सारडा विद्यालयामध्ये इयत्ता दहावीमध्ये शिकत असणाऱ्या मुस्तकीन तनवीर शेख याची २५ जून रोजी शाळेत हत्या झाली. मयत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांची ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी पदाधिकाऱ्यांसमवेत सांत्वन पर भेट घेतली. या भेटीनंतर हिंद सेवा मंडळाकडे लेखी पत्राद्वारे मयत विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांसह जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त यांना लेखी निवेदन देत विविध मागण्या काळे यांनी केल्या आहेत.

यावेळी सुनील भोसले, विलास उबाळे, सचिन भालेराव, विनोद शिरसाट, यासीर शेख, दानिश शेख, समीर शेख, सिकंदर शेख, तन्वीर शेख, सोनू शेख, अलीम शेख, तुकाराम गायकवाड आदी उपस्थित होते.

काळे म्हणाले, घडलेली घटनाही अत्यंत धक्कादायक असून यामुळे संपूर्ण शहर हे भयग्रस्त झाले आहे. या घटनेमुळे, विशेषत:, सदर विद्यालयात शिकणाऱ्या अन्य विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच त्यांच्या पालकांच्या मनावर याचा गंभीर परिणाम झाला आहे. याचे लोन शहरातील अन्य शाळांपर्यंत देखील पोहोचले असून एकूणच सर्वच पालक हे आपण मुलांना शाळेत पाठवतो खरं, परंतू मुलं शाळेत सुरक्षित आहेत काय ? या विचारामुळे चिंतेत आहेत. शालेय विद्यार्थ्यांचे बाल गुन्हेगारीकरण होणे ही समाजासाठी अत्यंत घातक बाब असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

शहराच्या आमदारांना एवढी मोठी घटना घडून देखील याबाबत कोणते ही पाऊल उचलावेसे वाटले नाही ही अत्यंत असंवेदनशील बाब आहे.

पोलीस अधीक्षकांकडे ठाकरे सेनेची मागणी : १) मयत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा., २) कुटुंबीयांचे म्हणणे आहे की, जेव्हा ते फिर्याद देण्यासाठी गेले त्यावेळी त्यांची फिर्याद ही योग्यरित्या घेतली गेली नाही. ती घेऊन या घटनेच्या मुळाशी जात सखोल सत्यशोधक तपास करत दोषींवर कठोर कारवाई करावी., ३) आपल्या शाळकरी अल्पवयीन मुलाच्या मृत्यूच्या धक्क्यात असणाऱ्या त्याच्या पालकांना त्यावेळी कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांनी तात्काळ फिर्याद नोंदवण्याबाबत सक्ती करत असंवेदनशील वर्तन केल्याचा पालकांचा आरोप आहे. याबाबत संबंधित पोलिसांची चौकशी करण्यात यावी.

पोलीस आणि जिल्हा प्रशासनाला निवेदन देत पुढील उपायोजना सुचवल्या : १) शहरामध्ये असणाऱ्या शाळांची संख्या मोठी आहे. हजारो विद्यार्थी या शाळांमधून शिक्षण घेतात. शाळांच्या संपूर्ण आवारात, वर्गां मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसविणे अनिवार्य करण्यात यावे., २) शाळांमध्ये आठवड्यातून किमान एकदा गस्त घालण्याकरिता विशेष पोलीस पथक नेमण्यात यावे., ३) विद्यार्थ्यांना शाळेमध्ये काही त्रास असल्यास आणि त्या कामी शाळा प्रशासना बरोबरच पोलिसांची देखील मदत हवी असल्यास त्यांना ती तक्रार पोलिसांपर्यंत पोहोचवता यावी याकरिता प्रत्येक शाळेमध्ये तक्रार पेटी उपलब्ध करून द्याव्यात., ४) प्रत्येक शाळेत प्रत्येकी एक महिला व पुरुष शिक्षकाची विद्यार्थी समुपदेशक म्हणून नेमणूक करण्यात यावी. त्यांना याबाबतचे आवश्यक ते प्रशिक्षण तज्ज्ञांकडून देण्यात यावे., ५) नेमण्यात येणाऱ्या / आलेल्या सदर समुपदेशक शिक्षकांची त्यांनी शाळेमध्ये कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्याबाबत कशा पद्धतीने काम करावे याबाबत पोलीस प्रशासनाचे मार्गदर्शन एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून देण्यात यावे., ६) या उपक्रमाची अंमलबजावणी करत असताना विद्यार्थ्यांच्या बाल मनावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, त्यांना मदत होईल अशा पद्धतीने कार्य करावे., ७) बाल मनोतज्ज्ञांना पाचारण करून विद्यार्थ्यांची सध्याची भयग्रस्त मनस्थिती लक्षात घेता त्यांचे योग्य ते समुपदेशन तातडीने करण्यात यावे., ८) विद्यार्थ्यांचे पालक देखील प्रचंड तणावा खाली आहेत. त्यांची पालक मीटिंग घेत त्यांचे देखील समुपदेशन करत त्यांच्या मनामध्ये आपल्या पाल्यांच्या सुरक्षितते विषयीचा विश्वास निर्माण करण्यासाठी पुढाकार घेण्यात यावा.



अहिल्यानगर तालुक्यातील गावात रेशनिंगचे धान्य वेळेत व ऑनलाईन पध्दतीने मिळत नसल्याची तक्रार वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

# रेशनिंगचे धान्य वेळेत व ऑनलाईन मिळत नसल्याने कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

नगर – अहिल्यानगर तालुक्यातील गावात रेशनिंगचे धान्य वेळेत व ऑनलाईन पध्दतीने मिळत नसल्याची तक्रार वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ग्रामस्थांसह शिष्टमंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सदर रेशन दुकानदारावर कारवाई करुन ग्रामस्थांना वेळेत ऑनलाईन पध्दतीने धान्य उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष योगेश साठे, तालुका अध्यक्ष रविकिरण जाधव, सल्लागार जे.डी. शिरसाठ, सुधीर ठोंबे, राजीव भिंगारदिवे, आतिफ शेख, अशोक लिपाने, संतोष उन्हाळे, काशिनाथ जाधव आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

रांजणी गावात रेशन धान्य दुकानदाराला दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात धान्य प्राप्त होत आहे. मात्र तो दुकानदार शेवटच्या दोन दिवसात धान्याचे वितरण करतो. गावात इंटरनेटची रेंज असून, देखील ऑफलाइन पद्धतीने धान्याचे वितरण केले जात आहे. या प्रकरणी दुकानदाराला विचारल्यास उडवाउडवीचे उत्तर देऊन, तो सरपंच व ग्रामस्थांनी ऑफलाइन वाटप करण्याची परवानगी दिली असल्याचे तो सांगत आहे. अनेकवेळा धान्य वाटप करताना स्वतः दुकानदार देखील हजर राहत नसल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

रांजणी गावातील रेशनिंगच्या सदर दुकानावर कारवाई करुन नियमित धान्य पुरवठा करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# रात्रीच्यावेळी संशयितरित्या थांबलेल्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी माळीवाड्यात पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधारात दुकानाच्या आडोशाला संशयास्पदरित्या दबा धरुन बसलेल्या एका संशयित गुन्हेगाराला कोतवाली पोलिसांनी शिताफीने पकडले. ही कारवाई १ जुलै रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास माळीवाडा वेशी जवळ करण्यात आली. रियाज मुस्ताक सय्यद (वय ३८, रा. बारातोटी कारंजा, माळीवाडा, अ.नगर) असे त्याचे नाव आहे.

कोतवाली पोलीस ठाण्यातील पोलीस आंमलदार संकेत धिवर आणि सहायक फौजदार अशोक सरोदे हे माळीवाडा परिसरात रात्र गस्त घालत असताना, माळीवाडा वेशीजवळील एका दुकानाच्या आडोशाला एक इसम संशयास्पद रित्या थांबलेला दिसून आला. स.फौ. सरोदे यांनी त्यास थांबवून विचारणा केली असता, त्याने पळण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत त्यास जागीच पकडले. त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रियाज मुस्ताक सय्यद (वय ३८, रा. बारातोटी कारंजा, माळीवाडा, अ.नगर) असे असल्याचे सांगितले.त्यास तेथे थांबण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी त्यास पोलीस ठाण्यात आणून अधिक चौकशी केली असता, तो कोतवाली पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यास अटक केली.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रियाज सय्यद याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# विद्यार्थ्यांच्या खून प्रकरणी मुख्याध्यापकांना निलंबित करून शिक्षक, कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अन्यथा आंदोलन



विद्यार्थ्यांच्या खून प्रकरणी सीताराम सारडा विद्यालयातील मुख्याध्यापकांना निलंबित करून शिक्षक, कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन रिपब्लिकन सेनेच्या वतीने माध्यमिक शिक्षण विभागाला देण्यात आले.

नगर – शालेय विद्यार्थ्यांच्या खून प्रकरणी हिंद सेवा मंडळ संचलित सीताराम सारडा विद्यालयातील मुख्याध्यापकांना निलंबित करून या विद्यालयातील शिक्षक, व इतर कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने माध्यमिक शिक्षण विभागाला निवेदन देताना जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, महेश भोसले, जिल्हा उपाध्यक्ष विकास रणदिवे, संजय ताकवाले, शहर उपाध्यक्ष विवेक विधाते आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, १८ जून रोजी शाळेच्या वेळेत दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास सर्जेपुरा भागातील दोन विद्यार्थ्यांमध्ये पूर्वीच्या किरकोळ वादातून भांडण झाले, त्या वादाचे पुनवर्सन म्हणजे आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने दहावी च्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पोटावर, छातीवर चाकूने वार करून खून केला. ही बाब निश्चितच हदरवून सोडणारी आहे. शाळेच्या आवारात अशी घटना घडली कशी? तसेच विद्यार्थ्यांकडे चाकू आला कसा? शाळेत सुरक्षा रक्षक आहेत की नाहीत? शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर अंकुश आहे की नाही? शाळेच्या आवारात खून होत असून या घटनेची जबाबदारी संस्था व शालेय व्यवस्थापनाची नाही का? असे प्रश्न निवेदनातून उपस्थित केले आहेत.

सीताराम सारडा विद्यालयात लालटाकी, सिद्धार्थनगर, निलक्रांती चौक, कोठला, मंगलगेट, सर्जेपुरा, आदी भागातील बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थीमुळेच शाळेची पट संख्या टिकून आहे. मग फक्त पट संख्या टिकवून ठेवण्या इतपतच शाळेची जबाबदारी आहे का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. या खून प्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापकाचे त्वरित निलंबन करून सर्व शिक्षक व इतर कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा लवकरात लवकर कारवाई न झाल्यास माध्यमिक शिक्षण विभागच्या दालनात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# नगरमधील सराईत गुन्हेगार एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्द

नगर – नगर शहर व परिसरात घातक शस्त्र व अग्निश शस्त्र बाळगणारा आणि कोतवाली व तोफखाना पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार बंटी उर्फ भावेश अशोक राऊत (वय ३२, रा. लाटे गल्ली, माणिक चौक) यास एम पी डी ए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे.

सराईत गुन्हेगार बंटी उर्फ भावेश अशोक राऊत याने कोतवाली व तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत व परिसरात त्याचे साथीदारांसह दरोडा टाकणे, घरात घुसुन महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे, बलात्कार करणे, तसेच जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, शिवीगाळ दमदाटी करुन मारहाण करणे, गावठी कट्टा वापरणे असे गंभीर स्वरुपाचे एकुण ११ गुन्हे करुन तेथील राहणारे सर्व सामान्य लोकांवर दहशत निर्माण केलेली होती. त्यामुळे तोफखाना व कोतवाली पोलीस ठाणे तसेच आजुबाजुच्या परिसरात सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली होती.

सराईत गुन्हेगार बंटी उर्फ भावेश राऊत याचे समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रचलीत कायदयान्वये करण्यांत आलेल्या प्रतिबंधक व हद्दपारीच्या कारवाया अपुऱ्या व कुचकामी ठरत होत्या. त्याचे गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध होण्यासाठी कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी एम.पी.डी.ए. कायदयान्वये प्रस्ताव तयार करुन उप विभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती (नगर शहर विभाग) यांचे व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्फत पोलीस अधीक्षकांना सादर केला होता.



सराईत गुन्हेगार बंटी राऊत याला स्थानबद्ध करण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर त्याला ताब्यात घेतलेले स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या प्रस्तावाची पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी बारकाईने पडताळणी करुन सदरचा प्रस्ताव हा शिफारस अहवालासह जिल्हादंडाधिकारी, अ.नगर यांना सादर केला होता. या प्रस्तावाची व सोबतच्या कागदपत्रांची जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पडताळणी करुन नगर जिल्हयातील सार्वजनीक सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता सराईत गुन्हेगार बंटी उर्फ भावेश राऊत यास स्थानबध्द करणे बाबतचे आदेश काढले. त्या आदेशान्वये पोलिसांनी त्यास ताब्यात घेवुन नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबध्द केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, उपनिरीक्षक तुषार धाकराव, स.फौ. रविंद्र पांडे, पोलीस अंमलदार सुरेश माळी, संदिप पवार, शाहिद शेख, रविंद्र घुंगासे, विशाल तनपुरे, रमिझ आतार, महादेव भांड (सर्व स्थानिक गुन्हे शाखा) व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार शिल्पा कांबळे व राहुल मासाळकर यांनी केली आहे.

# प्रोफेसर चौकात रात्री मोटार सायकलवर संशयितरित्या फिरणाऱ्या एकास पकडले

नगर – रात्रीच्या वेळी मोटारसायकलवर संशयितरित्या फिरणाऱ्या एकास तोफखाना पोलिसांनी पकडले. ही कारवाई सावेडी परिसरातील प्रोफेसर चौकाकडे जाणाऱ्या रोडवर ३० जून रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास केली. प्रणव प्रमोद शिंदे (वय १९, रा.पंचशीलनगर, भिंगार) असे या संशयिताचे नाव आहे.

तोफखाना पोलीस सावेडी परिसरात रात्री गस्त घालत असताना,पोलिसांनी प्रोफेसर चौकाकडे जाणाऱ्या रोडवर मोटारसायकलवर संशयित रित्या वावरणाऱ्या प्रणव शिंदे यास पकडले. इतक्या रात्री इकडे काय करतोस अशी विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाही. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन तोफखाना पोलीस ठाण्यात आणले. त्याच्याकडील हिरो होंडा कंपनीची करिझ्मा मोटारसायकल (क्रमांक एम एच १४ बी डब्ल्यू ७४८२) चे कागदपत्राबाबत चौकशी केली असता, त्याच्याकडे कागदपत्र उपलब्ध नसल्याने पोलिसांनी संशयित वाहन ही जप्त केले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात प्रणव शिंदे यांच्याविरुद्ध मुंबई पोलीस कायदा कलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस हवालदार सी डी आंधळे ही करीत आहेत.



स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रतिष्ठान ट्रस्ट, भिंगार यांच्या वतीने छावनी परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नुतन माध्यमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्याचा उपक्रम राबवण्यात आला.

# छावनी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश वाटप

भिंगार – स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा वारसा जपत आणि 'सेवा हीच खरी पूजा' या तत्त्वाला अनुसरून स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रतिष्ठान ट्रस्ट, भिंगार यांच्या वतीने छावनी परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नुतन माध्यमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात येणारे अडथळे दूर करणे आणि त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणे तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने शालेय जीवनात आत्मसन्मानाने शिक्षण घ्यावे, यासाठी गणवेशासारख्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये, ही भावना या कार्यामागे आहे. संस्थेचे सामाजिक उत्तरदायित्व जपत अनेक वर्षांपासून स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान विविध उपक्रमांच्या माध्यमातून गरजूंना मदत करत असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी यावेळी सांगीतले.

शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक करत म्हटले की, विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक साहित्य पुरवणे पुरेसे नाही, तर त्यांच्या आत्मभानाला आणि सामाजिक समरसतेला पोषक असे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे शिक्षण अधिक समतोल आणि सर्वसमावेशक होते.

या कार्यामागील स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या समाजप्रती असलेल्या बांधिलकीबद्दल शाळा प्रशासन, शिक्षकवर्ग, पालक आणि विद्यार्थी यांच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी शाम जाजू, शिवप्रसाद काळे, शशिकला शेंडे, संगीता देऊळगावकर, सुनिल तरवडे, रमेश वराडे, गोरक्ष वामन, अर्जुन हळगावकर आदी उपस्थित होते.

सुत्रसंचालन स्नेहल लवांडे यांनी तर प्रास्ताविक महेश भगत यांनी केले. संजय हजारे यांनी आभार मानले.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पात्र प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ

**१ कोटी रुपयांपर्यंतचे प्रकल्प आता योजनेसाठी पात्र**

नगर – शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित युवक–युवतींची वाढती संख्या आणि उद्योग–व्यवसाय क्षेत्रातील उपलब्ध संधी लक्षात घेऊन शासनाने 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' सुरु केला आहे. या योजनेअंतर्गत उत्पादन उद्योगांसाठी पात्र प्रकल्पाची किंमत ५० लाख रुपयांवरून १ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी दिली.

या योजनेअंतर्गत पूर्वी उत्पादन उद्योगांसाठी ५० लाख रुपये व सेवा उद्योगांसाठी २० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना पात्रता होती. योजनेची व्यापकता वाढविणे आणि अधिकाधिक उद्योजकांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केल्या आहेत.

किमान वय १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक असून, कमाल वयाची कोणतीही अट नाही. उत्पादन उद्योगांसाठी प्रकल्पाची किंमत १ कोटी रुपयांपर्यंत असू शकते, मात्र अनुदानासाठी पात्र प्रकल्पाची मर्यादा ५० लाख रुपये आहे. या अनुदानाची कमाल मर्यादा १७ लाख ५० हजार रुपये आहे. सेवा उद्योगांसाठी प्रकल्पाची मर्यादा ५० लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामध्ये अनुदानासाठी पात्र प्रकल्पाची मर्यादा २० लाख रुपये असून, कमाल अनुदान ७ लाख रुपयांपर्यंत मिळू शकते.

उत्पादन क्षेत्रातील १० लाख रुपयांवरील प्रकल्पांसाठी व सेवा क्षेत्रातील ५ लाख रुपयांवरील प्रकल्पांसाठी किमान ८वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी प्रक्रियात्मक व सेवा उद्योगांमध्ये आता फिरते अन्नविक्री केंद्र, मधमाशी पालन, शाकाहारी व मांसाहारी हॉटेल, ढाबा, क्लाऊड किचन, मासेमारी, कुक्कुटपालन, अंडी उबवणी केंद्र, रेशीम उद्योग, होम स्टे, जलक्रीडा व प्रवासी बोटींचा समावेश करण्यात आला आहे.

ही योजना पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येते. इच्छुक अर्जदारांनी www.empgp.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत. अर्जासोबत छायाचित्र, आधारकार्ड, जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/ स्थायिकत्व प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्रे, विहित नमुन्यातील हमीपत्र, प्रकल्प अहवाल, लागू असल्यास जात प्रमाणपत्र, पॅनकार्ड, तसेच ग्रामीण भागातील अर्जदारांसाठी ग्रामपंचायतीकडील लोकसंख्येचा दाखला ही कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. माहितीसाठी ०२४१–२३५५३४२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.



### अभिनेता अभय प्रताप वर्मा यांनी केला ध्यानधारणेचा अभ्यास

जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या विले पार्ले सेवाकेंद्राला अभिनेता अभय प्रताप वर्मा याने भेट देऊन ध्यानधारणेचा अभ्यास केला. मोटिवेशनल स्पीकर बी के क्रीना दीदी यांनी अभय प्रताप वर्मा याला मार्गदर्शन करून ध्यानधारणेचा अभ्यास करून घेतला. यावेळी अभय प्रताप वर्मा याला परमपिता परमात्मा निराकार ज्योतिर्बिंदू शिव बाबांची फ्रेम मोटिवेशनल स्पीकर बी के क्रीना दीदी यांच्या हस्ते भेट देण्यात आली. यावेळी बी के प्रतिभा दीदी व डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

# दोन दारु अड्ड्यावर छापा; मुद्देमालासह २ जण ताब्यात

नगर – बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारु तयार करुन विक्री करणाऱ्या दोन दारु अड्ड्यावर नगर तालुका पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत ८२ हजार रुपये किमतीची गावठी दारु जप्त करून दोघांना ताब्यात घेतले. ही कारवाई नगर तालुक्यातील खातगाव टाकळी शिवारात केली.

नगर तालुका पोलिसांनी हिंगणगाव ते खातगाव टाकळीकडे जाणाऱ्या रोडवर असलेल्या दारु अड्डयावर छापा टाकून दीपक माधव पवार (वय ६१, रा. खातगाव टाकळी) यास ताब्यात घेऊन त्याच्या कडून ८ हजार रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु आणि ३० हजार रुपये किमतीचे दारु तयार करण्याचे कच्चे रसायन असा ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दुसऱ्या कारवाईत राजेंद्र विलास पवार (वय २२, रा. खातगाव टाकळी) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील ४ हजार रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु व ४० हजार रुपये किमतीचे दारु बनवण्यासाठी लागणारे कच्चे रसायन असा ४४ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा कलम ६५ (ई ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

